# प्रशालेय

## वार्षिक वृत्त

सौर शके १९४५–४६

दि. १ मे २०२३ ते दि. ३० एप्रिल २०२४



# ज्ञान प्रबोधिनी प्रशाला


पत्ता : ज्ञान प्रबोधिनी प्रशाला

५१०, सदाशिव पेठ, पुणे ४११०३०

दूरभाष : (०२०) २४२०७७००० / २४२०७१२१

ईमेल : prashala@jnanaprabodhini.org

संकेतस्थळ : www.prashala.jnanaprabodhini.org

फेसबुक पेज : Jnana Prabodhini Prashala

ब्लॉग : https://jnanaprabodhiniprashala.blogspot.com

# ज्ञान प्रबोधिनी, पुणे

**पदाधिकारी २०२३-२४**

**अध्यक्ष** – डॉ. रघुनाथ माशेलकर
**उपाध्यक्ष** – डॉ. विजय केळकर
**कार्याध्यक्ष** – श्री. श. बा. तथा रवि पंडित
**संचालक** – वाच. गिरीश बापट
**कार्यवाह** – श्री. वि. शं. तथा सुभाष देशपांडे
**सहकार्यवाह** – श्री. विश्वनाथ गुर्जर

**सन्माननीय सदस्य**

**डॉ. श्री. रघुनाथ माशेलकर –** माजी महासंचालक, सी.एस.आय.आर., नवी दिल्ली
**श्री. अण्णा हजारे –** सामाजिक कार्यकर्ते
**श्रीमती अनु आगा –** माजी खासदार, उद्योजिका, सामाजिक कार्यकर्त्या
**वाच. जयंत नारळीकर –** माजी संचालक, आयुका, पुणे

# ज्ञान प्रबोधिनी, पुणे

**कार्यकारी मंडळ सदस्य शके १९४५-१९४६ (इ. स. २०२३-२४)**

## निर्वाचित सदस्य

१) वाच. श्री. रघुनाथ माशेलकर
२) वा. गिरीश बापट
३) श्री. वि. शं./ सुभाष देशपांडे
४) श्री. विश्वनाथ गुर्जर
५) श्री. रामकुमार राठी
६) श्री. मोहन गुजराथी
७) वा. विवेक कुलकर्णी
८) वा. सुधाताई कोठारी
९) श्री. महेश आठवले
१०) वा. मनोज देवळेकर
११) प्रा. महेंद्र सेठिया
१२) वा. अनघाताई लवळेकर
१३) प्रा. सुवर्णा गोखले
१४) वा. मिलिंद नाईक

## संचालक नियुक्त सदस्य

१५) प्रा. प्रशांत दिवेकर
१६) श्री. आशुतोष बारमुख
१७) शर्मिष्ठा चिपळूणकर
१८) वा. मधुरा लुंकड
१९) श्री. नचिकेत नित्सुरे

## प्रशालेतील पदाधिकारी शके १९४५-१९४६ (इ.स. २०२३-२४)

**प्राचार्य** – वा. मिलिंद नाईक
**समन्वयक** – प्रा. रागिणी नाईक (इ. ९वी ते १०वी)
**युवक समन्वयक** – प्रा. रागिणी नाईक
**युवती समन्वयक** – प्रा. संस्कृती बापट
**सहनिवास व दलसमन्वयक** – प्रा. प्रवीण पायगुडे
**अर्धवेळ अध्यापक समन्वयक** – प्रा. शिल्पा पवार
**पर्यवेक्षिका** – प्रा. मुकुलिका थत्ते
**समन्वयक** – प्रा. वर्षा पुराणिक (इ. ५वी ते ८वी)
**शास्त्र** – प्रा. मुकुलिका थत्ते
**भाषा** – प्रा. अश्विनी जोशी, प्रा.लक्ष्मी रोशन
**सा. अध्ययन**– प्रा. संस्कृती बापट
**गणित** – प्रा. वर्षा पुराणिक

## पालक शिक्षक संघ (इ.स. २०२३-२४)

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १) ५ वी मुली | ज्योती चौधरी | | २) ५ वी मुले | सचिन मिरजे |
| ३) ६ वी मुली | अवंती काळे | | ४) ६ वी मुले | माधुरी साने |
| ५) ७ वी मुली | ज्ञानेश्वर नेरकर | | ६) ७ वी मुले | योगिनी शुक्ल |
| ७) ८ वी मुली | अमित जोशी | | ८) ८ वी मुले | मोनाली भिडे |
| ९) ९ वी मुली | शलाका मेहता | | १०) ९ वी मुले | दीप्ती जोशी |
| ११) १० वी मुली | संजय राठोड | | १२) १० वी मुले | परशुराम कापसे |

**अध्यक्ष** – वा. मिलिंद नाईक
**उपाध्यक्ष** – श्री. आशुतोष नाईक
**सचिव** – सौ. अश्विनी जोशी
**सहसचिव** – श्री. हृषीकेश राजहंस, श्री. उल्हास टिळेकर

## शिक्षक प्रतिनिधी

✻ वाच. मुकुलिका थत्ते ✻ प्रा. रागिणी नाईक ✻ प्रा. वर्षा पुराणिक ✻ प्रा. प्रवीण पायगुडे

## वाहतूक समिती

**अध्यक्ष** – वा. मिलिंद नाईक
**शिक्षक प्रतिनिधी** –श्री. प्रवीण पायगुडे
**पालक प्रतिनिधी** – श्री. उल्हास टिळेकर, सौ. रूपाली बेदरकर

# • भूमिका •

# • संपादकीय •

# • अनुक्रमणिका •


**१) शैक्षणिक प्रयोग**

१.१ गतिमान प्रभुत्व अध्ययन - अध्यापन पद्धती
१.२ विशेष उद्दिष्ट गट
१.३ दृक्-श्राव्य साधनांच्या साहाय्याने अध्यापन-अध्ययन
१.४ प्रकल्पातून अध्ययन
१.५ बुद्धिगुण विकास योजना
१.६ अभिव्यक्ती विकसन

**२) विद्यार्थ्यांसाठी विशेष उपक्रम**

२.१ विद्याव्रत संस्कार
२.२ गणेशोत्सव
२.३ बौद्धिक प्रगल्भता
१) विशेष व्याख्याने
२) विशेष वर्ग
२.४ अभ्यास शिबिरे
२.५ विशेष अभिरुची गट
२.६ प्रकल्प शिबिर

**३) सामाजिक जाणीव**

३.१ सहाध्याय दिन
३.२ आषाढी एकादशी - वारीतील सहभाग
३.३ राष्ट्रीय दिन - कार्यक्रम
३.४ वस्ती उपक्रम

**४) मानसिक समृद्धी**

४.१ संस्कार कार्यक्रम - विद्यारंभ, वर्षारंभ, वर्षान्त उपासना
४.२ साप्ताहिक उपासना व चिंतन
४.३ आषाढी एकादशी - भजन गायन

**५) शारीरिक कौशल्ये**

५.१ युवक दले - स्वा. सावरकर दल
५.२ युवक दले - डॉ. बाबासाहेब आंबेडकर दल
५.३ युवती दले

**६) नेतृत्वगुण विकसन**

६.१ कौशल्य प्रशिक्षण
६.२ अग्रणी तासिका
६.३ गुरुपौर्णिमा कार्यक्रम
६.४ सरस्वती पूजन
६.५ अग्रणी प्रशिक्षण शिबिर

**७) अध्यापक प्रशिक्षण व बैठका**

७.१ अध्यापक प्रशिक्षणे
७.२ अध्यापक बैठका
७.३ सहविचार बैठका
७.४ पालक बैठका

**८) यश**

८.१ शालान्त परीक्षा
८.२ बाह्यपरीक्षांतर्गत
८.३ स्पर्धांतर्गत

**९) विशेष दखल**

९.१ वर्गशः संचालक भेट
९.२ भेटीगाठी - प्रशालेस मान्यवरांनी दिलेल्या भेटी
अन्य संस्थांना भेटी
९.३ प्रासंगिक

**१०) कृतज्ञता : देणगीदार, हितचिंतक**

# ज्ञान प्रबोधिनी प्रशाला

**इ. स. २०२३–२४**

## १. शैक्षणिक प्रयोग

### १.१ गतिमान प्रभुत्व अध्ययन–अध्यापन पद्धती

इ. ५ वी ते ८ वी साठी गणित आणि इंग्रजी या विषयांसाठी आपापल्या क्षमतेनुसार व गतीनुसार पुढचे पुढचे अध्ययन करीत वरच्या स्तरात जाण्याची संधी या अध्ययन पद्धतीतून मिळते. इंग्रजी व गणित या महत्त्वाच्या विषयांचे पायाभूत ज्ञान दृढ होण्यास या प्रयोगाने मदत होत आहे. दरवर्षीच्या अनुभवावर आधारित बदल करत हा प्रयोग आता चांगला रुळला आहे. पुनर्भरण वर्गाची भर या स्तरात पडली आहे. या प्रयोगाचा परिणाम मुलांच्या क्षमता व कौशल्यवाढीमध्ये दिसत आहे.

### १.२ विशेष उद्दिष्ट गट :

'रूप पालटू देशाचे' या उद्दिष्टासाठी ज्ञान प्रबोधिनी प्रशालेची सुरुवात देशप्रश्न सोडविणारे कार्यकर्ते–नेते तयार व्हावेत म्हणून झाली. या उद्दिष्टाला धरून थेट प्रश्नाला भिडणाऱ्या कार्यकर्त्यांच्या सहवासानेच ही गोष्ट घडू शकेल असा विश्वास असल्याने विशेष उद्दिष्ट गटाची योजना आपण गेली तेरा वर्षे राबवत आहोत. यामधे त्यांच्या त्यांच्या क्षेत्रातील एखाद्या प्रश्नावर प्रत्यक्ष काम करणारे मार्गदर्शक विद्यार्थ्यांशी संवाद साधतात, प्रश्नाची जाणीव करून देतात, प्रत्यक्ष कामाचा अनुभव देतात. शैक्षणिक वर्ष २०२३–२४ मध्ये इयत्ता ९वीच्या मुलांसाठी राष्ट्रीय एकात्मता, ऊर्जा, अर्थशास्त्र, लोकशाही शिक्षण, सामाजिक मानसशास्त्र व मुलींसाठी राष्ट्रीय एकात्मता, सामाजिक उद्योजकता, ऊर्जा, लोकशाही शिक्षण,सामाजिक मानसशास्त्र, सामाजिक आरोग्य हे विषय होते. मार्गदर्शक म्हणून संतोष गोंधळेकर, धृव गोखले, श्रीनिवास देसाई, प्रज्ञाताई अक्कलकोटकर, आशुतोषदादा बारमुख, डॉ. निलांगी सरदेशपांडे, अनुप गुळाणीकर, मृण्मयी पोंक्षे, मेघना गोखले यांनी वर्षभर मुलांना व्याख्यान, चित्रफिती दाखवणे, क्षेत्रभेटी, तज्ज्ञांचे व्याख्यान अशा विविध माध्यमातून या विषयांची अभ्यासपूर्ण ओळख करुन दिली.

ऊर्जा गटातील मुले जानेवारी महिन्यात पिरंगुट येथील grogas Plant येथे जाऊन गवतापासून Bio-CNG कसा तयार होतो ह्याचे प्रात्यक्षिक पाहून आले. सामाजिक आरोग्य गटातील मुली मार्च महिन्यात महानगरपालिकेच्या दवाखान्यात जाऊन तेथील कामकाजाची माहिती घेतली.

विशेष उद्दिष्ट गटाचे विषय मुलांना ठरवता यावेत म्हणून दरवर्षी आपण या विषयांच्या प्रास्ताविक व्याख्यानांची योजना करतो. यावर्षीच्या इ. ९वीसाठीची काही प्रास्ताविक व्याख्याने एप्रिल महिन्यात व काही जून महिन्यात झाली.

कायदा आणि घटना या विषयाचे व्याख्यान श्रीनिवास देसाई यांनी १९ एप्रिल २०२४ रोजी, ऊर्जा या विषयाचे व्याख्यान संतोष गोंधळेकर यांनी २० एप्रिल २०२४ रोजी, अर्थशास्त्र या विषयाचे व्याख्यान अनुप गुळाणीकर यांनी ११ जून २०२४, राष्ट्रीय एकात्मता या विषयाचे व्याख्यान आशुतोषदादा बारमुख यांनी १२ जून

२०२४, सामाजिक आरोग्य डॉ. निलांगी सरदेशपांडे यांनी १५ जून २०२४ रोजी मुलींकडे व २५ जून २०२४ रोजी मुलांकडे, पर्यावरण या विषयाचे व्याख्यान पिनाकिन कर्वे यांनी १८ जून २०२४ रोजी मुलांकडे व १९ जून २०२४ रोजी मुलींकडे, सामाजिक मानसशास्त्र या विषयाचे व्याख्यान गार्गी देवचके व मेघना गोखले यांनी २४ जून २०२४२ रोजी, ग्राम विकसन या विषयाचे व्याख्यान सुवर्णा गोखले यांनी २० जून २०२४ रोजी घेतले.

## १.३ दृक् – श्राव्य साधनांच्या साहाय्याने अध्यापन – अध्ययन

अध्यापनात दृक्-श्राव्य साधनांचा उपयोग वादातीत आहे. यावर्षी प्रबोध उद्योग समूहाच्या देणगीमधून सर्व वर्गामध्ये मिळून एकूण १२ स्मार्टबोर्डस् बसवण्यात आले. इंटरनेटचे कनेक्शन असलेल्या या स्मार्टबोर्डस्मुळे अध्ययन-अध्यापन पद्धती अधिक सुलभ, आनंददायी व सहज झाली आहे. तसेच ४० टॅबलेटस्ची भर यावर्षी पडली. त्यामुळे एकावेळी एका वर्गात सर्व विद्यार्थी संगणकाधारित अध्ययन करू शकतात. आभासी पद्धतीने तास घ्यावे लागत असल्याने ई-टेक या स्कूल सॉफ्टवेअरच्या आधारे सर्व प्रकारच्या नोंदी व मूल्यमापन करण्यात आले.

## १.४ प्रकल्पातून अध्ययन

पाठ्यपुस्तकातून माहिती घेत असतानाच स्वत: प्रयोग करून, गृहीतके मांडून, वाचन करून, संदर्भ पुस्तके धुंडाळून, प्रत्यक्ष अनुभव घेऊन त्या माहितीचे ज्ञानात रूपांतर करण्याचा हमखास मार्ग म्हणजे प्रकल्प पद्धती 'स्वत: करून बघणे' व 'शिकण्यास शिकणे' या दोन महत्त्वाच्या अध्ययन तंत्राचा वापर विद्यार्थी येथे करत असतात. प्रकल्पपद्धती ही ज्ञान प्रबोधिनीच्या शिक्षण पद्धतीतील अविभाज्य भाग आहे. यावर्षी यातील भर म्हणजे इ. ५वी ते ९वी या वर्गात सर्व प्रकल्प प्रकारांचा अनुभव घेतल्यानंतर इ. १०वी मध्ये 'समस्या परिहार प्रकल्प' करण्यासाठी प्रकल्पाचा कोणताही एक वा अनेक प्रकार वापरून बघण्याचे स्वातंत्र्य देण्यात आले. यावर्षी या प्रकल्पांची सुरुवात झाली. यावर्षी इ. ५ वी ते इ. १० वी पर्यंतच्या प्रकल्पांची काठिण्यपातळी व जटिलता क्रमाने वाढत जाईल अशी रचना पुढीलप्रमाणे केलेली होती.

| इयत्ता | प्रकल्प प्रकार | तपशील |
|---|---|---|
| ५ वी | १. संग्रहात्मक (वस्तू)<br>२. संग्रहात्मक (कात्रणे) | १. वस्तूंचे संकलन/वर्गीकरण करणे.<br>२. माहितीचे संकलन/विश्लेषण करणे. |
| ६ वी | १. संग्रहात्मक (कात्रणे)<br>२. प्रतिकृती | १. माहितीचे संकलन/विश्लेषण करणे.<br>२. वैज्ञानिक उपकरणे बनवणे. |
| ७ वी | १. प्रतिकृती<br>२. सर्जनशील लेखन | १. वैज्ञानिक उपकरणे बनवणे.<br>२. प्रतिभाशाली लेखन – स्वनिर्मिती |
| ८ वी | १. सर्जनशील लेखन<br>२. संशोधनात्मक | १. प्रतिभाशाली लेखन – स्वनिर्मिती<br>२. संशोधनाची शास्त्रीय पद्धत वापरून समस्या सोडवणे. |
| ९ वी | १. संशोधनात्मक<br>२. भविष्यवेध | १. संशोधनाची शास्त्रीय पद्धत वापरून समस्या सोडवणे.<br>२. भविष्यवेधाची तंत्रे वापरून सामाजिक रचनांच्या |

भविष्याबाबत शात्रीये अंदाज बांधले

**✲ बाह्यपरीक्षण करणारे मान्यवर ✲**

| इयत्ता | प्रकल्प प्रकार | परीक्षक |
|---|---|---|
| ५ वी | संग्रहात्मक (वस्तू)<br>संग्रहात्मक (कात्रणे) | शुभंकर खळदकर<br>शुभंकर खळदकर |
| ६ वी | संग्रहात्मक (कात्रणे)<br>प्रतिकृती | आदित्य पोंक्षे<br>आदित्य पोंक्षे |
| ७ वी | प्रतिकृती<br>सर्जनशील लेखन (मराठी)<br>सर्जनशील लेखन (इंग्रजी) | आदिश फुलावरे<br>अश्विनी जोशी<br>हेमांगी देशमुख, शिल्पा पवार |
| ८ वी | संशोधनात्मक<br>सर्जनशील लेखन (मराठी)<br>सर्जनशील लेखन (इंग्रजी) | आदित्य पोंक्षे<br>भाग्यश्री हर्षे<br>अदिती हर्डीकर, चेतन जोशी |
| ९वी | संशोधनात्मक | आदित्य पोंक्षे |

## २.६ प्रकल्प शिबिर

एप्रिल महिन्यामध्ये इयत्ता आठवीचे संशोधनात्मक प्रकल्पाचे शिबिर झाले. प्रकल्पाला लागणारी निरीक्षण, प्रश्न, प्रणाली विश्लेषण, प्रयोग संरचना अशी विविध कौशल्ये या शिबिरामधील सत्रांमधून विद्यार्थ्यांनी शिकून घेतली. शिबिराच्या शेवटी एका छोट्या प्रयोगावर या सर्व कौशल्यांचा सराव केला.

**✲ प्रकल्प प्रदर्शन**

दि. ६ एप्रिल २०२४ रोजी प्रशालेतील वार्षिक प्रकल्प प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. प्रदर्शनाच्या उद्‌घाटन कार्यक्रमास वा. संगीताताई कुलकर्णी (प्रशाला-तुकडी      ) या प्रमुख पाहुण्या म्हणून आल्या होत्या. त्यांच्या हस्ते प्रत्येक वर्गातील दोन्ही सत्रांतील सर्वोत्तम प्रकल्पांना बक्षिसे देण्यात आली. प्रशालेतील व संशोधनातील त्यांचे अनुभव व त्यातून कळालेले प्रकल्प करण्याचे महत्त्व यावर संगीताताईंनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

आपण केलेले काम जसे परीक्षणाच्या वेळी तज्ज्ञांसमोर मांडता आले पाहिजे तसेच ते सामान्य व्यक्तींपुढे सुद्धा तितक्याच चांगल्या प्रकारे मांडता आले पाहिजे; या उद्देशाने प्रशालेत प्रकल्प प्रदर्शन भरवले जाते. कार्यक्रमानंतर सर्व प्रकल्पांचे खुले प्रदर्शन सुरू करण्यात आले. प्रमुख अतिथी व प्रदर्शन पाहायला आलेल्या पालक व इतर सर्वांना विद्यार्थ्यांनी स्वतः केलेले प्रकल्प व त्यातून मिळालेले निष्कर्ष यथोचित समजावले.

## १.५ बुद्धिगुण विकास योजना

डॉ. जे. पी. गिलफोर्ड यांनी मांडलेल्या प्रारूपावर आधारित इयत्ता सातवीच्या गुणविकास योजनेचा अभ्यासक्रम तयार केलेला असतो. डॉ. गिलफोर्ड यांच्या प्रारूपानुसार बुद्धीचे स्वरूप तीन बाजूंनी निश्चित होत असते. पहिली बाजू विचाराचे माध्यम आहे. दुसरी बाजू विचारांची प्रक्रिया व तिसरी बाजू विचाराची निष्पत्ती.

बुद्धिगुणविकास या योजनेसाठी यांपैकी पहिल्या दोन बाजूंचा विचार केला आहे. विचारांच्या माध्यमातून दृश्य, श्राव्य, प्रतीकात्मक, आशयात्मक व वर्तनात्मक गोष्टींचा विचार केला आहे. तर प्रक्रियेत आकलन, स्मरण, बहुदिश विचार, एकदिश विचार व मूल्यमापन या प्रक्रियांचा अंतर्भाव आहे. पाच विचारांची माध्यमे व पाच विचारांच्या प्रक्रिया अशा २५ घटकांचा अंतर्भाव या अभ्यासक्रमात करण्यात आला आहे.

वर्ष २०२३-२४ मध्येही बुद्धिगुण विकास योजनेअंतर्गत २५ कृती चाचण्या घेतल्या. त्याद्वारे ७ वी मुलांच्या व मुलींच्या वर्गातून ६ मुले व ६ मुली यांची शिष्यवृत्तीधारक म्हणून निवड करण्यात आली. या बारा जणांनी सर्व २५ चाचण्यांत उत्तम गुण संपादन केले. त्यांना इ. ८ वी ते १० या तीन वर्षांसाठी रुपये ५०० ते २००० अशी शिष्यवृत्ती दिली जाईल.

बुद्धिगुणविकास योजनेअंतर्गत बक्षिसपात्र म्हणून पाच मुले व पाच मुली अशा १० जणांची निवड करण्यात आली. त्यांना प्रत्येकी ३०० रुपयांपर्यंतची पुस्तके देण्यात आली. अशा एकूण बारा शिष्यवृत्तीधारक आणि दहा बक्षीसपात्र विद्यार्थ्यांची यादी पुढे दिली आहे.

**❊ शिष्यवृत्तीधारक विद्यार्थी तपशील ❊**

| इयत्ता | विद्यार्थाचे नाव | क्रमांक |
|---|---|---|
| ७ वी मुले | अनुज शहा | पहिला |
| | अथर्व भिडे | दुसरा |
| | प्रथम ढोकले | तिसरा |
| | आदित्य काळदाते | चौथा |
| | आर्यन पवार | पाचवा |
| | श्रेयस देशपांडे | सहावा |
| ७ वी मुली | अवनी भट्टड | पहिला |
| | कियाना चुत्तर | दुसरा |
| | अविका आचार्य | तिसरा |
| | रचिता चौगुले | चौथा |
| | वेदा पटवर्धन | पाचवा |
| | अनन्या आठल्ये | सहावा |

**❊ बक्षीसपात्र विद्यार्थी तपशील ❊**

| इयत्ता | विषय | विद्यार्थ्याचे नाव |
|---|---|---|
| ७ वी मुले | दृश्य | निनाद गोडबोले |
| | श्राव्य | अभिजात वाळंबे |
| | प्रतिकात्मक | हर्षवर्धन लोहार |
| | आशयात्मक | गंधार दांडेकर |
| | वर्तनात्मक | आदित्य कामत |
| ७ वी मुली | दृश्य | तन्वी मुंढे |
| | श्राव्य | वैदेही बगाते |
| | प्रतिकात्मक | संस्कृती जरे |
| | आशयात्मक | आरायना जाधव |
| | वर्तनात्मक | स्वराली घाडगे |

## १.६ अभिव्यक्ती विकसन

आपले विचार व भावना मोकळेपणाने व्यक्त करण्यासाठीचे अभिव्यक्ती हे महत्त्वाचे माध्यम मानले गेले आहे. मुलांनी वर्षभर आपल्या आवडत्या अभिव्यक्तीचे मार्गदर्शन तासिका, व्याख्याने, भेटी, प्रात्यक्षिके, शिबिरे या माध्यमातून घेऊन आपली कौशल्ये वाढविण्याचे प्रयत्न केले. गायन, वादन-पेटी, तबला, नृत्य, लेखन, वक्तृत्व, नाट्य, चित्रकला व शिल्पकला या अभिव्यक्ती माध्यमांवर मुलांनी काम केले.

### ❊ अभिव्यक्ती शिबिर

इयत्ता ७ वी ते ९ वीच्या विद्यार्थी-विद्यार्थिनींचे अभिव्यक्ती शिबिर दिनांक ८ एप्रिल ते २२ एप्रिल पर्यंत उत्साहात पार पडले. २४ एप्रिल, बुधवार रोजी मुलांचे तर २५ एप्रिल, गुरुवार रोजी मुलींचे सादरीकरण व प्रदर्शन झाले.

दोन कलाविषय हे एकत्र करून त्यांचा एक गट अशा पद्धतीने एकेका विषयाचे प्रात्यक्षिक झाले.

यात लेखनाच्या मुलांनी व मुलींनी संहिता लेखनाचे काम केले व चित्र शिल्पकलेच्या मुला-मुलींनी नेपथ्य तयार करण्याचे काम केले.

यावर्षीच्या शिबिरात विद्यार्थ्यांकडूच वेगवेगळे विषय घेऊन, त्यातील ४ विषय अंतिम केले गेले. मुलींचे विषय पुढीलप्रमाणे - रामायण (नृत्य), व्यसन (नाट्य), ऐतिहासिक व्यक्ती (संगीत), Twist in Childhood life (वक्तृत्व), मुलांचे विषय पुढीलप्रमाणे - २० वर्षांनी कोमातून उठलेला माणूस (नृत्य), Use of folk arts to conveying stories (नाट्य), कळतंय पण वळत नाही (संगीत), Zero to hero (वक्तृत्व). मुलींच्या गटाने यावर्षी चित्र-शिल्प प्रदर्शनाच्या उद्‌घाटनासाठी Installation Art चा नवा प्रयोग केला होता.

**मुलींचे विषय –**

१. नृत्य प्रधान – रामायण

२. नाट्य प्रधान – व्यसन

३. संगीत प्रधान – ऐतिहासिक व्यक्ती

४. वक्तृत्व प्रधान – Twist in Childhood life

**मुलांचे विषय –**

१. नृत्य प्रधान – २० वर्षांनी कोमातून उठलेला माणूस

२. नाट्य प्रधान – Use of folk arts to conveying stories

३. संगीत प्रधान – कळतंय पण वळत नाही

४. वक्तृत्व प्रधान – Zero to hero

या कार्यक्रमासाठी लागणारे लेखन, नाटकाचे दिग्दर्शन, गायनात कवितांचे लेखन, त्याला चाली देण्याचे काम ते लयीत बसवण्याचे काम, सादरीकरणासाठीच्या नेपथ्याचे काम विद्यार्थ्यांनी या शिबिरात केले. दि. २२ एप्रिल रोजी याची भरत नाट्य मंदिरामध्ये रंगीत तालीम झाली.

## अभिव्यक्ती – प्रात्यक्षिक

२४ एप्रिल, बुधवार मुलांचे प्रदर्शन व सादरीकरण झाले व २५ एप्रिल, गुरूवार मुलींचे प्रदर्शन व सादरीकरण झाले. सादरीकरणाच्या दिवशी लाईट आणि साऊंड देण्याचे काम अशा तांत्रिक जबाबदाऱ्यासुद्धा विद्यार्थ्यांनीच घेतल्या होत्या. या सर्वातून त्यांना एक नवा अनुभव मिळाला.

मुलींच्या गटाने यावर्षी चित्र – शिल्प प्रदर्शनाच्या उद्घाटनसाठी इन्स्टॉलेशन आर्टचा नवा प्रयोग केला होता.

विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या कलाकृतींचे प्रदर्शन व सादरीकरण बघण्यासाठी प्रमुख पाहुणे म्हणून मुलांकडे पं. रामदासजी पळसुले (प्रसिद्ध तबलावादक, प्रशाला तुकडी – ) व मुलींकडे मा. अस्मिता अत्रे (चित्रकार, प्रशाला तुकडी – ) हे लाभले होते. त्यांनी सर्व कार्यक्रमाचे रसग्रहण करून कार्यक्रमाच्या शेवटी सभेमध्ये विद्यार्थ्यांना व पालकांना मार्गदर्शन केले. या दोन्ही कार्यक्रमांचा समारोप आदरणीय संचालक गिरीशराव बापट यांनी पालकांना मार्गदर्शन करून केला.

## २. विद्यार्थ्यांसाठी विशेष उपक्रम

### २.१ गणेशोत्सव

सौर भाद्रपद २८, शके १९४५ (मंगळवार, १९ सप्टेंबर २०२३) यादिवशी ज्ञान प्रबोधिनी, पुणे येथील गणरायाची प्रतिष्ठापना अनुराधाताई ओक, सचिव, माध्यमिक शालान्त परीक्षा विभाग यांच्या हस्ते झाली. दरवेळेप्रमाणे अखंड उत्साहात पाचवी ते दहावीच्या मुलामुलींनी गणपती प्रतिष्ठापनेची उपासना एकदिलाने करून पुढच्या दहा दिवसांच्या आनंदपर्वाची सुरुवात केली. सकाळची आरती, वेगवेगळ्या स्पर्धा (शुभेच्छापत्र तयार करणे, पत्रलेखन, मुखपृष्ठ बनवणे, प्रश्नमंजुषा, बातमीलेखन इ.), व्यवसायाभिमुख अभ्यासक्रमांच्या छोट्या कार्यशाळा (पर्यटन, आर्थिक साक्षरता, प्रथमोपचार, पाककला, हस्तकला या पाच विषयांवरच्या कार्यशाळा लहान गट - मोठा गट, मुलं आणि मुली यांच्याकडे स्वतंत्रपणे, म्हणजे एकंदरीत २० ठिकाणी कार्यशाळा घेण्यात आल्या) व्याख्यानं-कार्यक्रम अशा कृतिकार्यक्रमांमुळे हे काही दिवस दप्तराशिवायची शाळा मुलांनी अनुभवली.

*** आरतीसाठी उपस्थित पाहुणे ***

| तारीख | वार | प्रमुख अतिथी |
|---|---|---|
| १९/०९/२०२३ | मंगळवार | प्रतिष्ठापना - मा. सौ. अनुराधा ओक, सचिव, एससीईआरटी |
| २०/०९/२०२३ | बुधवार | सौ. शोभा खंदारे, शिक्षणाधिकारी |
| २१/०९/२०२३ | गुरुवार | श्री. राजेंद्र शाळीग्राम, कायदेशीर सल्लागार |
| २३/०९/२०२३ | शनिवार | ह.भ.प. चारुदत्तबुवा आफळे, राष्ट्रीय कीर्तनकार |
| २५/०९/२०२३ | सोमवार | सौ. संध्या गायकवाड, शिक्षणाधिकारी |
| २६/०९/२०२३ | मंगळवार | सौ. नेहा बेलसरे, शिक्षणाधिकारी |
| २७/०९/२०२३ | बुधवार | सौ. कमलादेवी आवटे, शिक्षणाधिकारी |
| २८/०९/२०२३ | गुरुवार | मा. महेंद्रभाई आणि सौ. स्वप्नालीताई सेठिया,<br>प्रमुख - नेतृत्व विकसन केंद्र |

## ❊ अभिव्यक्ती सादरीकरणे – छोटा गट ❊

| तारीख | वार | कार्यक्रम | सादरकर्ते |
|---|---|---|---|
| २०/०९/२०२३ | बुधवार | वादन – जलतरंग | श्री. मिलिंद तुळाणकर |
| २१/०९/२०२३ | गुरुवार | गायन सादरीकरण | प्राजंली बर्वे, दिग्विजय देशमुख, जयंत साने |
| २३/०९/२०२३ | शनिवार | नृत्यकथा | रमा कुकनुर आणि गट |
| २५/०९/२०२३ | सोमवार | गर्जा महाराष्ट्र | पालक अभिव्यक्ती गट |
| २६/०९/२०२३ | मंगळवार | गोष्ट इथे संपत नाही | सारंग मांडके व सारंग भोईरकर |
| २७/०९/२०२३ | बुधवार | मुलाखत | चित्रकार श्री. चिंतामण हसबनीस |

## ❊ देशप्रश्न व्याख्यानमाला – मोठा गट ❊

| तारीख | वार | कार्यक्रम | सादरकर्ते |
|---|---|---|---|
| २०/०९/२०२३ | बुधवार | अमृत काळातील भारत | डॉ. वामन पारखी |
| २१/०९/२०२३ | गुरुवार | चिरंतन विकासातील आव्हाने | श्री. सुनील दाढे |
| २३/०९/२०२३ | शनिवार | विकसित व्यक्तिमत्त्व आणि समाज | ह.भ.प. चारुदत्तबुवा आफळे |
| २५/०९/२०२३ | सोमवार | समान नागरी कायदा | ॲड. सायली गानू |
| २६/०९/२०२३ | मंगळवार | भारतीय ज्ञानपरंपरा | वाच. श्रीनंद बापट |
| २७/०९/२०२३ | बुधवार | शाश्वत विकासात वंचित घटकांची भागिदारी | डॉ. नीलांगी सरदेशपांडे |

### ❊ व्यावसायिक कार्यशाळा (समांतर सत्र) ❊

| विषय | मुले – व्याख्याते | मुली – व्याख्याते |
|---|---|---|
| आर्थिक साक्षरता | श्री. संदीप चोगटू | तेजस्विनी चोगटू |
| प्रथमोपचार | डॉ. रिंकू भळगट | डॉ. सायली पेंडसे |
| पाककला | सिद्धेश पुरंदरे | शुभदा चौगुले |
| हस्तकला | रुपाली बेदरकर | आसावरी गोगटे |
| पर्यटन | पिनाकीन कर्वे | पिनाकीन कर्वे |

| विषय | मुले – व्याख्याते | मुली – व्याख्याते |
|---|---|---|
| आर्थिक साक्षरता | अमोल सुगंधी | अजित नाईक |
| अन्न प्रक्रिया | चिंतामणी सहस्त्रबुद्धे आणि | रोहिणी भोसले आणि |
| आणि उत्पादन | डेलना फर्नांडिस | डेलना फर्नांडिस |
| आरोग्य | डॉ. प्रेरणा बनसोडे | डॉ. ईशा गुजर |
| डिझाईन थिंकींग | आशुतोष प्रचंड | किरण सबनीस |
| पर्यटनक्षेत्राची ओळख | पिनाकीन कर्वे | पिनाकीन कर्वे |

### ❊ वर्गश: स्पर्धा ❊

| तारीख | ५ वी व ६ वी, ७ वी व ८ वी | ९ वी व १० वी |
|---|---|---|
| २०/०९/२०२३ | शुभेच्छा पत्र तयार करणे. | शुभेच्छा पत्र तयार करणे. |
| | सण व कौतुक उत्सव | कृतज्ञता व्यक्त करणे. |

| तारीख | ५ वी ते १० वी |
|---|---|
| २०/०९/२०२३ | माझं जरा चुकलंच.. आणि मला शाबासकी मिळाली... |
| २१/०९/२०२३ | 'प्रशालेय' मुखपृष्ठ बनवणे |
| २६/०९/२०२३ | २३/०९/२०२३ ते २९/०९/२०२३ –<br>महाराष्ट्र टाइम्स व टाइम्स ऑफ इंडियावर आधारित प्रश्नमंजुषा |
| २७/०९/२०२३ | बातमी लेखन |

## २.२ बौद्धिक प्रगल्भता

### १) विशेष व्याख्याने

यावर्षी पाठ्यविषयांशी निगडित आणि काही अन्य विषयांवरील व्याख्यानांची योजना विद्यार्थ्यांसाठी केली होती. त्यात पुढीलप्रमाणे व्याख्याने झाली.

| दिनांक | इयत्ता | विषय | वक्ते |
|---|---|---|---|
| २६/०६/२०२३ | १० वी | सिंथेटिक बायोलॉजीची ओळख | आयआयएसईआर आयजीएमएस चे विद्यार्थी |
| २७/०७/२०२३ | १० वी | भूशास्त्र | प्रा. निनाद भागवत |
| ०८/०८/२०२३ | ९ वी | लेखक तुमच्या भेटीला (हास्यचित्रांवर आधारित दृक-श्राव्य कार्यक्रम) | श्री. मधुकर धर्मापुरीकर |
| ०८/१२/२०२३ | ५ वी ते ८ वी | प्लास्टिक जनजागृती | देवकी कुंटे |
| ०९/१०/२०२३ १३/१०/२०२३ | ५ वी | आकाशकंदिलांची कार्यशाळा | सौ. चारुशीला रसाळ |
| १९/०१/२०२४ | ८ वी ते ९ वी | संशोधनाकडे वळा | श्री. सारंग ताम्हणकर |

## २) विशेष वर्ग

**⁕ पुनर्भरण वर्ग**

इ. ९ वीतून १० वीमधे जाताना ज्या विद्यार्थ्यांना सरासरी ५० टक्क्यांपेक्षा कमी गुण (विषयश: आणि एकूण) मिळाले आहेत. अशा विद्यार्थ्यांसाठी जून महिन्यापासून सकाळी १० ते १०.४५ या वेळेत विषयश: पुनर्भरण वर्गांची व सायंकाळी ६ ते ७ सराववर्गाची रचना केली होती. हे वर्ग जून ते मार्च या कालावधीमध्ये घेतले गेले. तसेच यावर्षी इ. ९ वी तून १० वी मध्ये जाताना ज्या विद्यार्थ्यांना सरासरी ५० टक्क्यांपेक्षा कमी गुण (विषयश: आणि एकूण) मिळाले होते. अशा विद्यार्थ्यांसाठी एप्रिल मध्ये दररोज दोन तास व इ. ८ वी तून ९ वीत गेलेल्या निवडक विद्यार्थ्यांचे गणित व इंग्रजी विषयांसाठी दररोज एक तास पुनर्भरण वर्ग घेण्यात आले.

## २.४ अभ्यास शिबिरे

**इ. १० वी मुले – पूर्वतयारी शिबिर** – शिबिर सुरू व्हायच्या आधीपासून मुलांचं रोज सकाळी शाळा सुरू व्हायच्या आधी अभ्यास दल सुरू होते.

स्वयंअध्ययन व त्याचबरोबर गटामध्ये एकत्र अभ्यास या दोन्ही पद्धती मुलांच्या या सकाळच्या अभ्यास दलात सुरू होत्या. अभ्यासात अजून नेमकेपणा आणि सलग काळ अभ्यास करायची सवय लागावी म्हणून ३ दिवसांच्या अभ्यास शिबिराचे नियोजन केले होते.

गणित यज्ञ, पेपर सोडवणे, विषयांमधील शंका निरसन, गटचर्चा अशी अनेक सत्र शिबिरात झाली.

एकाग्रतेने, ठरवून सलगपणे अभ्यास पूर्ण करता येतो. याचा मुलांना अंदाज यायला या शिबिराचा उपयोग झाला. आपले नेमके कुठले विषय कमी पडत आहेत आणि त्यात काय भर घालू शकतो यानुसार सगळ्या मुलांनी परीक्षेपर्यंतचे नियोजन केले.

अभ्यासाचे साप्ताहिक नियोजन करणे, त्यानुसार आपला दिनक्रम योजणे, दिवसाच्या शेवटी अभ्यासाचा review घेऊन योग्य ते बदल करणे अशी अनेक स्वयंअध्ययन कौशल्यंसुद्धा मुलं यातून शिकले.

पहिल्या दिवशी अनिवासी शिबिर झाले, मात्र दुसऱ्या दिवशी अजून चांगला अभ्यास व्हावा यासाठी वर्गातीलच एका मुलाच्या घरी एकत्र राहून गणित यज्ञाचं निवासीसत्र झालं.

समारोपात अभ्यासातील पराक्रम करायचं आवाहन सगळ्यांनाच केलं गेलं. रात्रीची सायकल सहल, १० लाख रुपयांची कंदिल विक्री, धुंदीत केलेला गणेशोत्सव, ग्रामीण भागातल्या मुलांच्या तासिका घेणे अशा भव्य आव्हान, पराक्रमांसोबत अभ्यासातलाही पराक्रमसुद्धा करूया यासाठी सगळेचजण तयार झाले आहेत.

**इ. १० वी मुली** – इयत्ता दहावीमधील मुलींसाठी अभ्यास शिबिराची योजना केली होती. दिवसभरात मौनाभ्यास, प्रश्नपत्रिका सोडवणे, गटचर्चा या सत्रांच्या माध्यमातून सात तास अभ्यास होत होता. यासोबत रोज संध्याकाळी एक अशा चार सत्रांची योजना होती. यामध्ये प्रश्नपत्रिका लेखन, वेळेचे नियोजन, ताणाचे व अनुभव कथन अशी सत्रे झाली. आपण शिक्षण घेतो ते समाजासाठी काम करता यावे यासाठी असा संदर्भ मिळावा यादृष्टीने बागेश्रीताई पोंक्षे यांचे अनुभव कथन झाले.

## २.५ विशेष अभिरुची गट

विद्यार्थ्यांच्या विशेष अभिरुचींना प्रेरणा देणे व त्याद्वारे सर्वंकष ज्ञान वाढविणे या उद्देशाने तसेच विद्यार्थ्यांना शैक्षणिक आणि व्यावसायिक कामात उत्तमता गाठता यावी यासाठी विशेष अभिरुची गट तयार केले जातात.

विद्यार्थ्यांनी आपल्या आवडीनुसार एक विषय निवडायचा असतो. समान अभिरुची असणाऱ्या दहा विद्यार्थ्यांना मागणी केल्यानंतर तो विषय शिकवण्यासाठीची सोय प्रशालेकडून करून दिली जाते. विशेष अभिरुची वर्गाच्या निमित्ताने अनेक उपक्रम एकाच छताखाली देण्याचा प्रबोधिनीचा प्रयत्न असतो. त्यासाठी विद्यार्थ्यांच्या अभिरुचीला योग्य वाव दिला जातो. या वर्षी ३ जुलै २०२२ ते १५ मार्च २०२३ पर्यंत हे वर्ग घेतले.

ज्ञान प्रबोधिनी प्रशालेमध्ये इयत्ता पाचवी ते सातवीच्या विद्यार्थ्यांसाठी विशेष अभिरुची वर्गांची योजना केलेली आहे. विद्यार्थ्यांमध्ये जी ऊर्जा असते, एखादी वेगळी आवड असते, त्यास प्रोत्साहन देण्यासाठी म्हणून हे वर्ग शाळेच्या आधी एक तास म्हणजे, पावणेदहा ते पावणेअकरा या वेळात भरविले जातात.

**वर्ष २०२३–२४ या शैक्षणिक वर्षात पुढील विषय होते –**

धडपड (मेकर्स स्पेस), बुद्धिबळ (चेस), कॉम्प्युटर प्रोग्रामिंग, कॅनव्हास पेंटींग, सेल्फ डिफेन्स, ॲस्ट्रोनॉमी, मेहंदी ॲन्ड मंडल आर्ट, झूलॉजी, इंग्लिश, जर्मन.

१५ जुलै २०२३ ते १५ मार्च २०२४ या दरम्यान, सोमवार ते गुरुवार हे वर्ग भरविले गेले.

# ३. सामाजिक जाणीव

## ३.१ सहाध्याय दिन

चार भिंतीच्या पलीकडे जाऊन प्रत्यक्ष क्षेत्रभेटी घेणे व अनुभव शिक्षण घेणे हे महत्त्वाचे आहे. सहाध्याय दिनाच्या निमित्ताने यावर्षीही विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या संस्थांना भेटी देऊन नवनवीन अनुभव घेतले.

| वर्ग | स्थळ | अभ्यास |
|---|---|---|
| ५ | महात्मा फुले संग्रहालय, घोले रस्ता | संग्रहात्मक प्रकल्पासाठी मार्गदर्शनपर भेट |
| ६ वी मुली | बालगंधर्व कलादालन | शिवाजी महाराजांच्या मराठा सरदारांच्या वंशजांनी जतन केलेली शस्त्रास्त्रे |
| | जागृती मुलींची अंधशाळा, आळंदी | शाळेची रचना समजावून घेणे |
| ६ वी मुले | शिवाजी महाराजांच्या बारा मावळातील भोर, कारी, आंबवडे व पिसावरे | शिवरायांचा इतिहास प्रत्यक्ष जिथे घडला तिथे जाऊन तो समजून घेणे. |
| | ‘Wonder fold’ या प्रदर्शनास भेट | ओरिगामीचे दर्शन पाहणे. |
| ७ वी मुले | शिखांचे प्रार्थनास्थळ असलेले कॅम्पमधील गुरुद्वारा | |
| ७ वी मुली | दिनांक १३ व १४ जानेवारी २०२४ रोजी ७वी मुलींचा आकाशदर्शन हा सहाध्याय दिन बेलावडे, ता. मुळशी, जि. पुणे | टेलिस्कोपमधून सॅटेलाईटस् व नक्षत्रे पाहिली. शनी, गुरु, (Orion Nebula, Pleiades, M 97, M 79, M 41) देवयानी दीर्घिका इ. गोष्टी मुलींनी पाहिल्या. सूक्ष्मजीवशास्त्र, |
| ८ | आधारकर रिसर्च इन्स्टिट्यूट | अणुबलसूक्ष्मदर्शक (Atomic Force Microscope) व वनस्पती जतन, वनस्पती ऊती संवर्धन (Plant tissue culture) इ. विषयांशी संबंधित कामाच्या प्रयोगशाळा पाहणे. |
| ९ | ताम्हिणी घाट | जैवविविधता पाहणे. |
| १० | डेक्कन कॉलेज | वस्तुसंग्रहालय पाहणे. |

## ३.२ आषाढी वारी

महाराष्ट्रात संतांचा मोठा वारसा लाभला आहे. त्यांचे स्मरण व विठोबाचे भजन करण्यासाठी आषाढीस प्रबोधिनीचे सर्व सदस्य एकत्र येतात. आषाढी एकादशी निमित्ताने मोठ्या वर्गातील मुलांना एकत्रित येऊन भजन करण्याचा व त्याचे निरुपण ऐकण्याचा अनुभव घेता यावा हे या कार्यक्रमाचे उद्दिष्ट आहे. वारीच्या आनंदसोहळ्यात विद्यार्थी-विद्यार्थिनी विविध प्रकारे सहभागी होतात. मोठ्या वर्गातील विद्यार्थी-विद्यार्थिनी वारीत प्रत्यक्ष चालत सहभागी होतात. छोट्या वर्गातील विद्यार्थी-विद्यार्थिनी पुण्यातील दिंड्यांमधे जाऊन वारकऱ्यांशी गप्पा मारणे, अभंग गायन करून सहभागी होतात. वारीच्या पुढील टप्प्यांत सहभाग झाला.

| इयत्ता | स्वरूप |
|---|---|
| १०वी मुली | आळंदी ते पुणे (निवासी) |
| ९वी मुली | विश्रांतवाडी ते पुणे |
| ८वी मुली | हडपसर ते दिवेघाट (निवासी) |
| १०वी मुले | जेजुरी ते नीरा |
| ८वी, ९वी - १२ मुले | वाल्हे ते नीरा |
| ७वी मुले | पुणे ते हडपसर |

## ३.३ राष्ट्रीय कार्यक्रम

**⁕ दि. १५ ऑगस्ट**

आ. संचालकांच्या हस्ते स्वातंत्र्यदिनानिमित्त ध्वजारोहण झाले. यावेळी पुढील कार्यक्रम झाले.

**लहान गट –** स्वातंत्र्यदिनानिमित्त आयोजित इ. ५ वी ते ८ वी च्या विद्यार्थ्यांच्या पारितोषिक वितरण समारंभाच्या कार्यक्रमासाठी डॉ. ज्योतीताई रहाळकर उपस्थित होत्या. त्यांच्या हस्ते बुद्धिगुणशोधन योजनेतील यशस्वी विद्यार्थ्यांना पारितोषिक आणि शिष्यवृत्तीचे वितरण करण्यात आले. त्यानंतर त्यांनी मुलांना मार्गदर्शन केले. आपल्या मार्गदर्शनामध्ये ऐक्यभावना, संस्कार, अहंकार विरहित कर्म योजनाबद्ध रीतीने कामे पूर्ण करणे आणि आयुष्यातील वेळेचे महत्त्व अशा मुद्द्यांच्या आधारे जीवनात यशस्वी होण्याबद्दलचे मार्गदर्शन केले.

**मोठा गट** – स्वातंत्र्यदिनानिमित्त आयोजित इ. ९ वी व १० वीच्या विद्यार्थ्यांकरिता 'आसाम व मणिपूरमधील सद्यस्थिती – समज व गैरसमज' या विषयावरील व्याख्यान योजले होते. प्रशालेचा माजी विद्यार्थी कल्याणदादा सोनावणे याने त्याच्या आसाम दौऱ्याच्या सटीप सादरीकरणासह अनुभवकथन करत तेथील परिस्थिती कथन केली. माजी विद्यार्थिनी व सध्या मणिपूरमधे कार्यरत असणाऱ्या कार्यकर्त्या वीणाताई बेडेकर यांनी मणिपूरमधील त्यांचे काम, मणिपूरचा इतिहास-जीवन व तिथे सध्या घडत असणाऱ्या संघर्षातील वस्तुस्थिती याची अतिशय समर्पक मांडणी केली.

**⁕ प्रजासत्ताक दिन**

दि. २६ जानेवारी रोजी आ. संचालकांच्या हस्ते स्वातंत्र्यदिनानिमित्त ध्वजवंदन झाले. यावेळी पुढील

कार्यक्रम झाले.

**छोटा गट** – इ. ५ वी ते ८ वी च्या विद्यार्थ्यांकरिता व्याख्यात्या वाच. मनीषाताई शेटे यांनी 'कथा एका सेतूची' ही कथा सांगून त्यावर भाष्य केले.

सेतू म्हणजे दोन गोष्टींना जोडणारा दुवा, मग ते दोन गावे असतील, दोन विचार किंवा मने असतील. सेतूमुळे दोन वेगवेगळ्या गोष्टी एकत्र येऊ शकतात. 'राम सेतू' ही प्राचीन काळात घडलेली घटना आहे. यात नैसर्गिक घटकांचा वापर कसा झाला, हनुमंताच्या पराक्रमाचा, प्राण्यांचा सहभाग, अयोध्येचा इतिहास या गोष्टी बोलता बोलता थोडक्यात स्पष्ट केल्या. रामाच्या वनवासातला वानर कथा हा शेवटचा टप्पा. रामेश्वर ते श्रीलंका हे अंतर तुलनेने फार नाही. राम देवाचा अवतार किंवा हनुमान सीतेला पाठीवर बसवून केव्हाच आणू शकला असता पण सीतेला स्वातंत्र्याची आस, अन्यायाला वाचा फोडणे, सत्याचा विजय होण्याची गरज महत्त्वाची वाटते. यात मग युद्ध होऊन रामाचा विजय झाला. पण या युद्धाची सुरुवात सेतू बंधनातून झाली. दगडावर राम लिहून ते पाण्यावर तरंगू कसे शकते हा प्रश्न पडला पाहिजे. यात खडकाचा प्रकार लक्षात घेतला पाहिजे. यात खारीचा सहभाग पण महत्वाचा आहे. खार दुर्बलांचे प्रतीक आहे. रामाने तिचाही सहभाग कामात घेतला यात रामाचे नेतृत्व कौशल्य अधोरेखित होते. रामाकडे सैन्य कमी असले तरी मानसिक पाठबळ जबरदस्त होते. त्यामुळे विजय मिळवणे शक्य झाले. सेतू बांधताना समुद्र मागे हटावा म्हणून रामाने केलेले प्रयत्न आणि मग सेतू (पूल) बांधण्यासाठी नल याने मदत केली. नल हा त्यावेळचा इंजिनियर. त्याने पाण्यावर तरंगणाऱ्या खडकाचा वापर करत ५ दिवसात १०० योजनांचा सेतू पूर्ण केला. या कथेतून आपण काय शिकतो तर रामाने प्रयत्नपूर्वक अनेकांना जोडून घेतले. सेतू हे रामाने सामान्य लोकांमध्ये सामर्थ्य निर्माण करण्याचे प्रतीक आहे. सहनशीलता, सामंजस्य, सिद्धता, सीमोल्लंघन, सुसंवाद, सूचना, सेतू, सोशिकता, सौहार्द, संवाद या 'स' च्या बाराखडीतून रामाचे गुण कसे दिसतात हेही ताईंनी सांगितले.

एकमेकांना बांधून ठेवून अवघड गोष्ट सहज साध्य होते. अनेकांसाठी सेतू बांधायचा तर मातृभूमीला विसरून चालत नाही. विजयानंतर राम ती सत्ता बिभिषणाकडे सोपवून स्वभूमीत परतले. हेही मनीषाताईंनी अधोरेखित केले.

**मोठा गट** – इ. व १० वीच्या विद्यार्थ्यांकरिता ज्ञान प्रबोधिनी प्रशालेचा माजी विद्यार्थी व प्रशालेत सध्या इतिहास शिकवणारा श्रेयशदादा फापाळे याने 'जी२० : भारतापुढील जागतिक नेतृत्वाची संधी' या विषयावर व्याख्यान दिले.

जी२० म्हणजे काय हे समजावून सांगत दादाने विषय स्पष्ट करायला केला.

भारताकडे हे नेतृत्व कसे आले, त्या आधी ते कोणाकडे होते, साखळी पद्धतीने ते कसे मिळते हे सांगून भारताकडे नेतृत्व आल्यानंतर भारताने कोणकोणत्या बाबतीत वेगळे ठसे उमटवले हे सांगितले.

वेगवेगळ्या शहरांच्या संस्कृती आणि परिषदेतील बैठकांच्या विषयांची सांगड कशी घातली होती, हे सोदाहरण स्पष्ट केले. भारताच्या अमिताभ कांत यांनी शेर्पा म्हणून बजावलेली कामगिरी, निर्मला सीतारामन आणि एस जयशंकर यांनी केलेले नेतृत्व याबद्दल सांगितले

भारताने विकसनशील, अविकसित देशांचे आणि पर्यायाने जगाच्या पश्चिमेचे नेतृत्व करण्याची सुरुवात कशा पद्धतीने केली आहे हे विषद केले. जगामध्ये भारताची विश्वासार्हता वाढत चालली आहे व त्याबद्दल

भारताबाहेरील माध्यमांमध्ये नेमकी कोणत्या शब्दांमध्ये चर्चा होत आहे हे चित्रफीत दाखवून समजावले. या सर्व पार्श्वभूमीवर भारताला पुढील काळात कोणकोणत्या संधी आणि आव्हाने आहेत हे सांगून श्रेयश दादाने आपल्या भाषणाचा समारोप केला.

## ३.४ वस्ती उपक्रम

वर्ष २०२३-२४ हे ज्ञान प्रबोधिनी प्रशालेअंतर्गत 'वस्ती प्रकल्पाचे' नववे वर्ष! या वर्षामध्ये प्रकल्पाचा ४५ मुलांनी नियमित लाभ घेतला. यामध्ये ३२ मुली व १३ मुले सहभागी होती. यावर्षी प्रकल्पाची सुरुवात एप्रिल २०२३ पासून झाली. या प्रकल्पामध्ये दररोज संध्याकाळी साडेसहा ते आठ या वेळेत सोमवार ते शनिवार हा उपक्रम झाला. यामध्ये ४५ मिनिटे खेळ आणि ४५ मिनिटे अभ्यासिका झाली. यामध्ये शालेय पाठ्यपुस्तकातील अभ्यासक्रम शिकवणे, याबरोबरच गणित, भाषा, शारीरिक शिक्षण, आरोग्य, समाजशास्त्र, परिस्थिती ज्ञान या विषयांवर कृती कार्यक्रम घेतले. ते पुढीलप्रमाणे -

### ❊ अभ्यास कौशल्य

यामध्ये वाचन कौशल्य, श्रवण कौशल्य, भाषण कौशल्य, लेखन कौशल्य इत्यादी अभ्यास कौशल्य यावर सत्रं झाली. यामध्ये नियमित वाचन सराव, वाचन वेग आणि आकलनयुक्त वाचनाचा सराव घेण्यात आला. अनेक विद्यार्थ्यांच्या वाचनातील समस्या, अडथळे सोडविण्यासाठी प्रयत्न केले गेले. तर भाषण कौशल्यात आत्मविश्वास, हावभाव, चढउतार, उभे राहण्याची पद्धत, विषय इ. घटकांवर मार्गदर्शन केले गेले. अभ्यासाच्या वेगवेगळ्या सवयींबद्दलही मुलांशी बोलणं केलं.

### ❊ व्यक्तिमत्त्व विकसन

स्व-ओळख, आरोग्य, वैयक्तिक स्वच्छता, सवयी, स्थूलपणा, पाकीटबंद पदार्थ याबद्दल वेगवेगळ्या सत्रांमधून माहिती दिली. यावर आधारित वेगवेगळ्या गटकार्याची रचना करून वर्षभर गटात काम करण्याचा प्रयत्न केला.

### ❊ वैज्ञानिक दृष्टिकोन

शालेय पुस्तकातील प्रयोग आपली पृथ्वी, सूर्यमाला, सूर्यग्रहण, चंद्रग्रहण याबाबतचे समज-गैरसमज इत्यादी बाबी समजविण्यात आल्या. घर्षण आणि बल या विज्ञानाच्या पाठ्यपुस्तकातील प्रयोग करून दाखवले आणि मुलांनाही साहित्य वापरून प्रयोग करायला साहाय्य केले. तसेच विज्ञान दिन साजरा करून सी. व्ही. रमण यांच्या जीवनावर आधारित लघुपट दाखवण्यात आला. त्यांचा कामाची माहिती देण्यात आली.

### ❊ बुद्धिमत्ता संवर्धन

गटात विविध स्मरणशक्ती वाढवणारे खेळ शब्दकोडी, शब्दखेळ, ओरिगामी याअंतर्गत कागदी घडी करून प्राणी-पक्षी बनवण्याची सत्रं घेतली. भौमितिक रचनेतील त्रिमितीचे कागदी रचना तयार करून घेतल्या

**⁕ जीवन कौशल्य**

कागदी वस्तू तयार करणे, टाकाऊतून टिकाऊ वापरातील आकर्षक खेळणी तयार करण्यास प्रोत्साहन दिले यामध्ये पणती रंगविणे आणि विक्री, आकाश कंदील तयार करणे, भेटकार्ड तयार करणे, नारळाच्या कवट्यांपासून खेळणी व बाऊल तयार करणे इत्यादी गोष्टी शिकविल्या.

**⁕ विशेष दिनाचे आयोजन**

गुरुपौर्णिमा, स्वातंत्र्य दिन, विज्ञान दिन, संविधान दिन, प्रजासत्ताक दिन, मराठी भाषा दिन इत्यादी तसेच महापुरुषांच्या जयंती कार्यक्रमांचे आयोजन केले. त्यामध्ये विशेष त्या त्या विशेष दिनाचे महत्त्व समजून घेतले आणि महापुरुषांची कामे समजून घेण्याचा प्रयत्न केला.

**⁕ राष्ट्रीय एकात्मता**

भारताच्या शेजारील देश, सीमारेषा, राज्य, राजधान्या, प्राणी जीवन इत्यादी समजून घेतले. राष्ट्रगीताचा अर्थ समजून घेतला. त्याबद्दलची माहिती समजून सांगितली. संविधानाची प्रस्तावना सांगून त्यातील विशेष संकल्पना महत्त्व यावर व्याख्याने झाली. यासाठी श्रीराम सैदपुरे यांनी सहजपणे सोप्या रूपाने संविधान कसे समजून घेऊयात, यावर मार्गदर्शन केले.

**वस्ती फेरी पालक भेटी** – आठवड्यातून किमान एकदा आमच्या वस्ती फेऱ्या आणि पालकांच्या भेटी झाल्या. प्रत्येक विद्यार्थ्याच्या घरी आठ दिवसातून एकदा तरी जाता आले. सोबत स्पर्धा परीक्षा केंद्रातील ताईंच्या गटानेही मुलांच्या घरचे प्रश्न समजून घेण्यासाठी पालकांशी संवाद साधला.

**⁕ विशेष**

या वर्षात दोन शालाबाह्य विद्यार्थिनी आपल्या अभ्यासिकेत नियमित आल्या. वय वर्ष ११ आणि १३ असूनही आजपर्यंत त्यांनी कोणत्याही शाळेत प्रवेश घेतलेला नाही. परंतु आपल्या प्रकल्पात या मुली नियमित सहभागी झाल्या.

ज्ञान प्रबोधिनी स्पर्धा परीक्षा केंद्रातील ताई व दादांच्या गटाने जानेवारी आणि फेब्रुवारी या दोन महिन्यांकरिता स्वयंसेवी पद्धतीने आठवड्यातून एक गट याप्रमाणे दोन महिने मुलांसाठी अभ्यास आणि इतर अभ्यास कौशल्ये शिकवण्यासाठी मदत केली.

ताई व दादा यांची नावे पुढीलप्रमाणे – केतकी कुलकर्णी, अपूर्व राजपूत, हर्षदा अभ्यंकर, ईशा कुलकर्णी, प्राजक्ता भावसार, माधवी निकम, ऋतुजा दगडे, तेजस्विनी खांबे, साक्षी देऊळ, युगा सावर्डेकर, तेजस जोशी, शाहिद शेख, तन्मय गवळी, राम सैदपुरे

# ४. मानसिक समृद्धी

**४.१ संस्कार कार्यक्रम –** विद्यारंभ, वर्षारंभ, विद्याव्रत व्याख्याने, विद्याव्रत शिबिर, विद्याव्रत संस्कार, साप्ताहिक उपासना व चिंतन, आषाढी एकादशी – भजन गायन

**※ विद्यारंभ उपासना**

दि . १० जून या रोजी पाचवीत नवीन प्रवेश घेतलेल्या मुलांचा विद्यारंभ हा शैक्षणिक संस्कार झाला. प्रबोधिनीत आल्यावर पुढची सहा वर्षं काय शिकायचं आणि कसं शिकायचं याची विचारपूर्वक केलेली मांडणी, त्यासाठी स्वामी विवेकानंद, योगी अरविंद, स्वामी दयानंद यांचे विचार कसे दिशादर्शक आहेत हे कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे, प्रबोधिनीचे कार्यवाह माननीय सुभाषराव देशपांडे यांनी मांडले.

**※ वर्षारंभ उपासना (इ. ५ वी ते ८ वी)**

दि. १७ जून २०२३ रोजी प्रबोधिनीच्या परंपरेनुसार शैक्षणिक वर्षाची सुरुवात वर्षारंभ उपासनेने झाली. त्यानंतर छोट्या सभेचे आयोजन केलेले होते. एस.पी.एम. इंग्लिश स्कूलच्या प्राचार्या व प्रशालेच्या माजी विद्यार्थिनी असलेल्या माननीय रमाताई कुलकर्णी या प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या. या सभेमध्ये विद्यार्थ्यांनी वर्ग संकल्प तसेच अध्यापक, कार्यालयीन, ग्रंथालयीन व कर्मचारी सदस्यांनी संकल्प वाचन केले. अतिथींनी मार्गदर्शनपर व्याख्यानामध्ये संकल्प कशा प्रकारचे असावेत याविषयी मार्गदर्शन केले.

**※ वर्षारंभ उपासना (इ. ९वी व इ. १०वी)**

दि. १७ जून २०२३ रोजी ज्ञानप्रबोधिनीच्या वरच्या उपासना मंदिरामध्ये इयत्ता ९वी व १०वी या वर्गांच्या वर्षारंभ उपासनेचा कार्यक्रम पार पडला. उपासना झाल्यानंतरच्या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून साधू वासवानी प्रशालेच्या मुख्याध्यापिका डॉ. आरती पाटील प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या. या दरम्यान विद्यार्थ्यांनी वर्ग संकल्पनांचे व कार्यालयीन सदस्यांच्या संकल्पनांचेही वाचन झाले. अतिथींनी मार्गदर्शनपर व्याख्यानामध्ये त्यांचे वैयक्तिक अनुभव, तसेच प्रबोधिनीमध्ये विद्यार्थिनी असतानाचे अनुभव आणि आतापर्यंतचा प्रवास याच्यावर प्रकाश टाकला.

**※ विद्याव्रत संस्कार**

**विद्याव्रत संस्कार (इ. ८ वी)**

इ. ८वी तील विद्यार्थी–विद्यार्थिनींच्या व्यक्तिमत्त्व विकसनासाठी केला जाणारा हा महत्त्वपूर्ण शैक्षणिक संस्कार. इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांना विद्याव्रताची ओळख व्हावी, या दृष्टीने विद्याव्रत व्याख्यानमालेची सुरुवात झाली. त्यात पुढील मान्यवरांनी मार्गदर्शन केले.

## ❊ वर्षभर सुरू असलेली विद्याव्रत व्याख्यानमाला ❊

| विषय | व्याख्यानाचे सार |
|---|---|
| प्रास्ताविक<br>अश्विनीताई जोशी | विद्या व अविद्या यांमधला फरक, आधुनिक काळातील विद्याव्रत म्हणजे काय, शारीरिक, मानसिक, बौद्धिक, सामाजिक ते आत्मिक अशा ५ विकसनांची व त्यांना जोडून ६ व्रतांची मांडणी |
| शारीरिक विकसन<br>डॉ. सौगंध दादा देशमुख | ताकद, दम, वेग, चपळता याविषयी मांडणी. तसेच व्यायाम, योग्य आहार आणि विश्रांतीचे महत्त्व |
| शारीरिक विकसन<br>प्रज्ञाताई अक्कलकोटकर | मन, बुद्धी आणि शरीर या तिन्हीसाठी व्यायाम, आहार आणि विश्रांतीचे महत्त्व |
| आहारशास्त्र<br>वैद्य प्रयागदादा सेठीया | आहार, विहार, व्यायम, निद्रा तसेच आहारातील बदल, ऋतू, सर्व रस त्याच्याशी निगडित पदार्थ, खाण्यापिण्याच्या सवयी, पचनाचे महत्त्व, कसे खावे, किती खावे, काय खावे, कधी खावे यांविषयी मांडणी |
| व्यायाम शास्त्र<br>डॉ. मिलिंद मोडक | सूर्यनमस्काराचे महत्त्व, शारीरिक, मानसिक आणि सामाजिक आरोग्य इत्यादीचे ऋग्वेदात सांगितलेले व्यायामशास्त्र तसेच पंचतत्त्व याविषयी मार्गदर्शन. |
| विहार शास्त्र<br>डॉ. मंदार अक्कलकोटकर | संकल्पनांचे महत्त्व, संकल्पाप्रमाणे कोणतीही गोष्ट करणे, त्याची सवय लावणे – यात खाण्यापिण्याच्या सवयी, व्यायामाच्या सवयी, विश्रांती, तणाव सांभाळण्यासाठी संतुलित व्यायाम इत्यादीविषयी मार्गदर्शन. |
| मानसिक विकसन<br>मृण्मयीताई पोंक्षे | मी ते आम्ही आणि पुढे समाजासाठी आपले उपयोगीतत्व यावर मार्गदर्शन. चर्चा, इच्छा, जिद्द, धैर्य, प्रेरणा या गोष्टी देणाऱ्या व्यक्तिमत्त्वांचे आपल्या आयुष्यातील स्थान. दैनंदिनी लेखनाचे महत्त्व याविषयी मार्गदर्शन. |
| मानसिक विकसन<br>मेघनाताई गोखले | व्रत, विद्यार्थी दशा याचे स्पष्टीकरण. वेगवेगळ्या भावना, त्यांचे व्यवस्थापन, भावनांची तीव्रता व सुयोग्यता याविषयी संवादरूप मार्गदर्शन |
| मानसिक विकसन<br>डॉ. दीपकदादा गुप्ते | मनात येणाऱ्या वेगवेगळ्या भावना, त्याची कारणे, विविध भावनांचे होणारे परिणाम याविषयी मार्गदर्शन. विविध प्रसंग देऊन मुलींनी त्यावर नाट्य सादर केले. चित्रफित दाखवून सकारात्मक विचार, व्यक्तिमत्त्व विकसन, चित्ताची एकाग्रता, येणारे अडथळे व ते कसे दूर करावेत. याविषयी चर्चा, शेवटी बुद्धिबळ खेळाडू प्रज्ञानंद याचा व्हिडिओ दाखवून मार्गदर्शन. |
| बौद्धिक विकसन | माणूस व प्राण्यांमधला फरक, माणसांमध्ये असलेली प्रेरणा, बुद्धी, बुद्धीचे |
| संस्कृतीताई बापट | वेगवेगळे पैलू, त्यांचा वापर आपण कसा करतो? बुद्धिमत्ता म्हणजे काय? |
| | चांगले गुण मिळवणं म्हणजेच बुद्धिमत्ता नाही इ. याविषयी मार्गदर्शन. गिलफोर्ड |

| विषय | व्याख्यानाचे सार |
|---|---|
| | मॉडेलमधले १८० पैलू; तसेच निरीक्षण कौशल्य याविषयी विविध साधने व पीपीटी वापरून मर्गदर्शन. |
| सामाजिक विकसन सुवर्णाताई गोखले | ग्रामीण महिलांचे प्रश्न, बचत गट सुरुवात, महिला सक्षमीकरण, ग्रामीण महिलांचे प्रश्न यावर अनुभव कथन. ज्ञान प्रबोधिनीचं महिलांसाठी काम; तसंच आरोग्य क्षेत्रातलं काम याविषयीचे अनुभव आणि आव्हाने. |
| सामाजिक विकसन मुकालिकाताई थत्ते | आतापर्यंतच्या मुलांनी केलेल्या गटकार्याचा आढावा तसेच समाज म्हणजे एक प्रणाली कशी, यातील प्रत्येक घटकाचे महत्त्व याचे उदाहरणाद्वारे स्पष्टीकरण. भारतीयत्व, समाज, लोकांचे प्रश्न, अडचणी तसेच आपण समाजाचा भाग कसा व्हावा यावर मार्गदर्शन. |
| पोथीचा अर्थ अमृताताई जोशी | मातीच्या गोळ्याचं उदाहरण, पोथीतील प्रत्येक श्लोक, त्याचा अर्थ, त्यामागचा विचार यांचे स्पष्टीकरण, श्लोक सादरीकरण. |

**❊ विद्याव्रत शिबिरे**

दि. २९ जानेवारी ते ३१ जानेवारी या कालावधीत इयत्ता आठवी मुलांचे तसेच ३१ जानेवारी ते २ फेब्रुवारी या कालावधीत इयत्ता आठवी मुलींचे विद्याव्रत शिबिर सज्जनगड येथे झाले. शिबिरात मुला-मुलींनी विविध कृतिसत्रांचा अनुभव घेतला. त्यामध्ये वर्षभर झालेल्या व्याख्यानांची उजळणी, भित्तिपत्रके तयार करणे, निरीक्षण कौशल्य, ६ हॅट्स, श्रमदान, समाज मनोरा, वादविवाद, अडथळ्यांची शर्यत यांचा अनुभव घेतला. याचबरोबर काकड आरती, सकाळी केलेली उपासना, दासबोध पठण, संध्याकाळचे दल यांचाही अनुभव घेतला. माननीय संचालकांचे दोन्ही गटांकडे 'तेथे जाऊच जाऊ' याविषयी मार्गदर्शन आणि या पद्याच्या आधारे मुलांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे अशी व्याख्याने झाली. इयत्ता आठवी विद्यार्थ्यांच्या शिबिराचा समारोप माननीय संचालकांनी केला व इयत्ता आठवी विद्यार्थिनींच्या शिबिराचा समारोप माननीय प्रशांत दिवेकर सर यांनी केला.

**❊ विद्याव्रत संस्कार समारंभ**

दि. १० फेब्रुवारी आणि ११ फेब्रुवारी २०२४ या दिवशी अनुक्रमे मुलांचा आणि मुलींचा विद्याव्रत संस्कार समारंभ झाला.

मुलांच्या विद्याव्रत संस्कार समारंभासाठी मातृमंदिर संस्थेचे विश्वस्त मा. यशवंतराव लिमये हे प्रमुख पाहुणे म्हणून लाभले होते तर मुलींच्या विद्याव्रत संस्कार समारंभासाठी विद्याभारती संस्थेच्या अखिल भारतीय सचिव मा. वाच. मधुश्री सावजी प्रमुख पाहुण्या म्हणून लाभल्या होत्या.

मुलांकडे मार्गदर्शन करताना मा. यशवंतरावांनी स्वावलंबनात संस्कारांची यशस्वीता आहे, हे सांगितलं. व्रतचिन्हाचं, ध्येयनिष्ठतेचं महत्त्वही अधोरेखित केले. आव्हानांना तोंड देत 'रूप पालटू देशाचे' हे

लक्ष्य ठेवायला सांगून त्यांनी व्रतार्थींचे अभिनंदन केले आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

मधुश्रीताईंनी 'धरण-स्मरण-करण-क्षेपण' इत्यादी माध्यमातून घडणाऱ्या शिक्षण प्रक्रियेकडे उपस्थितांचे लक्ष वेधले. शिक्षणातून ज्ञान, आत्मविश्वास, धैर्य या गोष्टी जशा वाढीस लागतात तशाच शिक्षणाने आपल्या नकारात्मक भावनांचा लोप होणे गरजेचे आहे. शिक्षणातून संयम शिकणे, आपल्याकडे असलेल्या क्षमतांचे संवर्धन करणे, सकारात्मक आयुष्य जगणे गरजेचे आहे, असे त्यांनी सांगितले. आपल्या व्यक्तिगत आयुष्यातील घटना-प्रसंगांची जोड देत, दिलखुलास-मिश्किल पद्धतीने त्यांनी उपस्थितांशी संवाद साधला.

मा. प्राचार्यांनी आपल्या प्रास्ताविकात विद्याव्रत संस्काराची वर्षभर चालणारी प्रक्रिया दोन्ही दिवशी मांडली.

मा. संचालकांनी समारोपाच्या भाषणात कुटुंबातून, सहवासामुळे संस्कार मिळतात. शाळा-कुटुंब यातून विद्यार्थ्यांचा विद्यार्जन-देशसेवा-ईश्वरसेवा हा प्रवास सुखकर होतो, असे सांगून त्यादृष्टीने प्रबोध कुटुंबाची संकल्पना मांडली. दोन्ही दिवशी काही विद्यार्थ्यांची व पालकांची प्रातिनिधिक मनोगतंही झाली.

## ४.२ साप्ताहिक उपासना व उपासनेनंतरचे चिंतन

शनिवारच्या साप्ताहिक उपासनेनंतर लहान गटात अंजली कर्वे, रोहिणी ढवळे, संस्कृती बापट, श्रद्धा ताई केळकर, सुमित पुरोहित, श्रेयश फापाळे, नचिकेत नित्सुरे, अश्विनी जोशी, प्रणव पुजारी, ऋषिकेश कुलकर्णी, जयश्री काटीकर, रूपाली धर्माधिकारी, शिल्पा पवार, प्रज्ञा अक्कलकोटकर यांनी आपले चिंतन सादर केले.

मोठ्या गटात धनश्री बोधनी, राजेंद्र कोंडे, प्रमोद सडोलिकर, प्रशांत दिवेकर, शिरीष देशमुख, प्रवीण पायगुडे यांनी आपले चिंतन सादर केले.

## ४.३ आषाढी एकादशी भजन कार्यक्रम

दि. २९ जून २०२३ रोजी आषाढी एकादशीनिमित्त भजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. प्रशालेतील इयत्ता ७ वी ते १० वीचे विद्यार्थी-विद्यार्थिनी व ज्ञान प्रबोधिनीच्या अन्य विभागांतील सदस्य या भजन-उपासनेमध्ये भक्तिभावाने सहभागी झाले होते. सुमारे दीडतासाचा हा भजनाचा सोहळा अनुभवण्यासाठी माजी विद्यार्थी व पालक मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.

# ५. शारीरिक कौशल्य

## ५.१ युवक दले

युवक विभागातर्फे इ. ५ वी ते ७ वी च्या गटासाठी 'स्वा. सावरकर दल' व इ. ९ वी व १० वी साठी 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर दल' चालवले जाते. दररोज ५.३० ते ७.३० या वेळात खेळ, बौद्धिके याचबरोबर वर्षभरात अनेक उपक्रमही घेतले जातात.

### स्वा. सावरकर दल

वर्षाची सुरुवात झाली वारीमध्ये सहभाग घेण्यापासून. अज्ञात काळापासून चालत आलेल्या वारीमध्ये सहभागी होत मुलांनी वारकऱ्यांचे दर्शन घेत, त्यांच्याशी संवाद करत वारीची परंपरा समजून घेण्याचा प्रयत्न केला. पाचवीच्या मुलांनी शाळेच्या जवळ मुक्कामाला असणाऱ्या वारकऱ्यांशी संवाद साधला. सातवीच्या मुलांनी प्रत्यक्ष पुणे ते हडपसर ह्या टप्प्यात चालत वारी अनुभवली. या वारीमध्ये दरवर्षी सहभागी होण्याचा निश्चय मुलांनी करावा असा या मागील हेतू आहे.

**❊ मातृभूमि–पूजन**

१५ ऑगस्ट – स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने मुलांच्या घरी मातृभूमि–पूजनाचे कार्यक्रम घेण्यात आले.

**❊ दुर्गभ्रमण**

वैराटगड व पांडवगड या तशा आडवाटेवरच्या किल्ल्यांवर पथकशः दुर्गभ्रमण सहली यावर्षी झाल्या.

**❊ दैनंदिन क्रीडा दल**

समर्थ रामदास, महर्षी दयानंद, स्वामी विवेकानंद, योगी अरविंद हे ज्ञान प्रबोधिनीचे पथकाधिपती आहेत. पथक रचना म्हणजे नेतृत्वगुण विकासासाठी लावलेली वैशिष्ट्यपूर्ण रचना. पाचवी, सहावी व सातवीची १०–१०–१० अशी एकूण ३० मुले या पथकांमध्ये असतात. सहावी–सातवीच्या तीन जणांना व पथकातील अनेकांना दररोजच्या अनेक जबाबदाऱ्या वाटून देण्यात आल्या. अडीच महिने चाललेल्या या रचनेचा शेवट पथकशः क्रीडा सामन्यांनी झाला. दशहस्तांतरण (१० पासेस), चिरघोडी, बाटली पाणी, असे खेळ झाले. समर्थ रामदास पथकाने यामध्ये बाजी मारली.

**❊ गणेशोत्सव**

गणेशोत्सवात इयत्ता पाचवीच्या मुलांनी घरोघरी एकट्याने जाऊन अथर्वशीर्ष म्हटले. घरोघरी जाऊन अथर्वशीर्ष पठण हा ज्ञान प्रबोधिनीचा अभिनव उपक्रम! सर्व उच्चांक मोडत पाचवीतील ४० जणांनी २६०० हून अधिक घरांमध्ये जाऊन अथर्वशीर्ष म्हणले.

**❊ लेझिम**

सहावीच्या वर्गानी लेझीम हा सामूहिक नृत्य प्रकार शिकून चार ठिकाणी प्रात्यक्षिके केली.

**❊ संचलन**

७ वी मुलांनी शिस्तबद्ध संचालन केले.

**❊ विक्री उपक्रम**

दिवाळीच्या सुट्टीमध्ये मुलांनी पणत्या विकण्याचा अनुभव घेतला. आपल्या मधील विक्री कौशल्य वाढावे यासाठी हा उपक्रम घेण्यात आला.

**❊ खेळशः रचना**

पथकशः रचनेनंतर (दिवाळीच्या सुट्टीनंतर) खेळशः रचना ही आपली आणखी एक वैशिष्ट्यपूर्ण रचना दलावर लावली. मल्लखांब, खो खो, दंडू गोळा व हॉकी या चार खेळांपैकी एक खेळ निवडून तो दोन महिने सलग खेळून त्यामध्ये प्रावीण्य मिळवावे अशी यामागची योजना आहे.

**❊ जलतरण प्रशिक्षण**

पाचवीच्या वर्गाचे दोन जलतरण तलावांमध्ये महिनाभर जलतरण प्रशिक्षण पार पडले. जलतरण हे जीवनावश्यक कौशल्य मुलांनी शिकावे असा यामागील विचार.

रामबाग कॉलनीतील कोल्हटकर उद्यान, शुक्रवार पेठेतील नातूबाग मैदान व सदाशिव पेठेतील स. प. महाविद्यालयाचे मैदान अशा तीन ठिकाणी या दरम्यान सराव चालू होता. जलतरण, मल्लखांब या खेळांसाठी विशेष प्रशिक्षक बोलावले होते.

**❊ विद्यारंभ शिबिर**

पाचवी व सहावीच्या मुलांचे दिवभराचे विद्यारंभ शिबिर घेण्यात आले. पाचवीच्या विद्यारंभ शिबिराला लागूनच पाचवी पालकांची पालक बैठक झाली. ३० पालक या बैठकीला उपस्थित राहिले. दलाचा वर्षभराचा आढावा यामध्ये घेण्यात आला.

**❊ क्रीडा शिबिर**

डिसेंबर महिन्यामध्ये ५ वी व ६ वी मुलांसाठी क्रीडा शिबिराचे आयोजन करण्यात आले. एरवी दलावर वेळेअभावी घेता येत नाहीत असे २० खेळ मुलांनी खेळून पाहिले. ७ वी मुलांसाठी शहर परिचय शिबिर घेण्यात आले. आपण राहतो तो आजूबाजूचा परिसर डोळसपणे पाहणे, इतर लोक करतात ती कामे करून पाहणे असा वेगळा अनुभव मुलांनी ह्या निमित्ताने घेतला. रविवारच्या सुट्टीच्या दिवशीही वर्षभर दल घेण्याचा प्रयत्न केला. क्रिकेट, रंगपंचमी, अवांतर वाचन, चर्चा अशा एरवी दलावर घेत नाही अशा गोष्टी रविवारच्या दलावर झाल्या.

**⁕ सायकल सहल**

इयत्ता सातवीच्या मुलांच्या दोन सायकल सहली अनुक्रमे शिंदे छत्री व खडकवासला इथे झाल्या. स्वतःला शारीरिक ताणणे व सायकल नित्य वापरात आणणे हे या उपक्रमाचे हेतू होते.

दलांची चालू असलेली कामे पाहण्यासाठी संघटनेतील ज्येष्ठ कार्यकर्ते दलावर येत असतात. स्वातंत्र्यवीर सावरकर दलाचे चालू असलेले काम पाहण्यासाठी व दादांना, मुलांना मार्गदर्शन करण्यासाठी ज्ञान प्रबोधिनीचे मा. सहकार्यवाह श्री. विश्वनाथ गुर्जर व युवक संघटन सचिव श्री. आशुतोषदादा बारमुख यांची भेट झाली. दलावर रोज येण्याचे महत्त्व दादांनी सांगितले.

## ५.२ डॉ. बाबासाहेब आंबेडकर दल

**⁕ इयत्ता ९ वी**

दि. २७ ऑगस्ट २०२३ रोजी किल्ले जीवधन दुर्गभ्रमण सहल आयोजित करण्यात आली. शुक्रवारी रात्री ७.३० वाजता सर्वजण जीवधन किल्ल्याच्या पायथ्याशी असणाऱ्या घाटघर गावात पोहोचले.

जेवण केल्यानंतर पहिलं चर्चासत्र झालं. त्यानंतर काही मुले दादांसोबत फेरफटका मारण्यासाठी बाहेर पडले. एकाचे दोन गट झाले. एक गट स्वराज दादासोबत तर दुसरा ओमकार दादासोबत गेला. रात्री संपूर्ण अंधार होता, रिमझिम पाऊस सुरू होता, पुरेशी थंडी होती, हलके धुके होते अशा वातावरणात काहीशी घाबरलेली मुले एकमेकांसोबत अभंग, स्तोत्र म्हणत गप्पा मारत चालत होते. परिसरात कमालीची शांतता होती, असा विलक्षण अनुभव प्रत्येकाच्या कायम लक्षात राहील. बहुतांश जण भीती, थंडी, पाऊस विसरून जाऊन आता त्या विलक्षण वातावरणाचा आनंद घेत होते. काही वेळाने दोन्ही गट परतले.

दुसऱ्या दिवशी सकाळी संपूर्ण उपासना एकत्र झाली. ७.३० वाजता चहा घेऊन गट किल्ल्याकडे रवाना झाला. जुन्नर दरवाज्याच्या दिशेने सर्वजण निघाले. रिमझिम पाऊस सुरूच होता. सुरुवातीचा टप्पा सोपा होता. एकमेकांच्या सोबतीने गटाने हा टप्पा पूर्ण केला. पुढचा टप्पा खडकाळ होता. स्वतःच्या क्षमतांवर विश्वास ठेवून एक-एक करून सर्वजण १०.३० वाजता किल्ल्यावर पोहोचले. किल्ल्यावर पोहोचल्यावर उत्स्फूर्तपणे सर्वांनी बरची नृत्य केलं. धान्य कोठार बघून झाल्यावर गट वानरलिंगी सुळक्याकडे गेला. त्यानंतर कल्याण दरवाज्यापाशी न्याहारी झाली. न्याहारीनंतर कल्याण दरवाज्यातून नाणेघाटाच्या बाजूने १२.०० वाजता किल्ला उतरायला सुरुवात केली. कल्याण दरवाज्यातून उतरताना भरपूर पाऊस आणि वारा होता. टप्पा खडकाळ असल्याने उतरण्यासाठी भरपूर वेळ लागला. पायवाटेने १.३०-२.०० वाजता खाली येताच थोडा वेळ मुलांनी निवांतपणे एकत्र घालवला. काही वेळाने सर्वजण गावाकडे चालायला लागले. गावात ३.३० वाजता पोहोचल्यावर काहीजण तळ्यात पोहले. ४.०० वाजता जेवण करून काही वेळ विश्रांती घेतली.

संध्याकाळी ५.०० वाजता गटकार्यांसाठी मुलांचे ९ गटांमध्ये विभाजन केले गेले. ग्रामपरिचय हे गटकार्यांचे मुख्य उद्दिष्ट होते. त्यानुसार ऊर्जा, अर्थव्यवस्था, शेती, राजकारण, इतिहास, रोजगार, स्थापत्य अशा सर्व बाजूंनी गाव समजून घेण्याचा मुलांनी प्रयत्न केला. कृतिसत्रानंतर तास-दीड तासाचे चर्चासत्र झाले. प्रत्येक गटाने त्यांनी केलेल्या गोष्टी सर्वांसमोर मांडल्या. दमलेले असूनसुद्धा प्रत्येकाने मनापासून सहभाग

घेतला. रात्री जेवणानंतर काही वेळ पद्य आणि अभंग म्हणून दिवसाचा शेवट झाला.

रविवारी घाटघर – जुन्नर – पुणे असा परतीचा प्रवास करून गट दुपारी १.३० वाजता पुण्यात परतला.

**❊ उद्योजकता प्रशिक्षण उपक्रम**

ज्ञान प्रबोधिनी युवक विभाग आणि युवक प्रबोधन उद्योग यांचा संयुक्त उद्योजकता प्रशिक्षण उपक्रमाच्या अंतर्गत यावर्षी दिवाळीच्या निमित्ताने आंबेडकर दलाने (८ ते १० वी मुले) कर्वे रोडला स्टॉल लावला होता. त्या व्यतिरिक्त काही भागांत घरपोच विक्री देखील केली.

उद्योगाचे अनेक पैलू शिकण्याची संधी या उपक्रमातून सहभागी युवकांना मिळाली.

मार्केट सर्व्हेपासून सुरुवात करून पणत्या, कंदील होलसेल बाजारातून आणणे, स्वतः रंगवणे, तयार करणे, पॅक करणे या कामांपासून अंतिम किंमती ठरवणे, वेबसाईट करणे, ब्रोशर तयार करणे, लाईटची सर्किट्स करणे, रोजचे पूर्ण हिशोब ठेवणे इथपर्यंत सर्व कामे – मार्केट सर्व्हे ते डिस्प्ले, मार्केटिंग, घरपोच विक्री, व्यवहार याचे सगळ्याच प्रकारचे उत्तम काम या मुलांनी केले.

मार्गदर्शक दादांनी यातील विविध खात्यांची जबाबदारी घेऊन नेतृत्वाची संधी घेतली. निर्णय घेणे, चिकाटी, धाडस, समयसूचकता, निवेदन आणि शुचिता अशा गुणांचे प्रात्यक्षिक त्यांना यानिमित्ताने अनुभवता आले.

उद्योजकतेचे शिक्षण हे वर्गात न होता प्रत्यक्ष अनुभवातून व्हावे, अशी या उपक्रमामागची भूमिका आहे.

## ५.३ युवती दले

**❊ वारी**

दहावीसाठी आळंदी ते पुणे, नववीसाठी विश्रांतवाडी ते पुणे आणि आठवी साठी हडपसर ते दिवेघाट हे वारीचे टप्पे नियोजित केले होते. यातला एक टप्पा (आळंदी ते पुणे) निवासी होता व बाकीचे अनिवासी होते.

**❊ गणेशोत्सव**

**शालेय गट**

प्रशालेतील पाचवी ते दहावी मुलींचा विविध प्रकारे सहभाग होता.

इयत्ता पाचवी सहावीच्या मुली अथर्वशीर्ष पठणासाठी जवळपासची घरे व पथकशः चार मंडळांमध्ये गेल्या होत्या. सातवीच्या मुलींच्या गटाने लेझिम नृत्याच्या माध्यमातून सहभाग घेतला तर नववी दहावीच्या मुलींचे गट बर्ची नृत्य सादरीकरणात होते.

अथर्वशीर्ष, लेझिम, बर्ची गट याशिवाय एक नवीन गोष्ट म्हणजे इयत्ता आठवी मुलींना कलरीपयट्टू हा युद्धकलेचा प्रकार शिकवण्यात आला. भगवान परशुरामांनी केरळमध्ये हा युद्धकलेचा प्रकार शिकवायला सुरुवात केली. यातूनच पुढे कुंफू, तायक्वोंदो अशा युद्धकलांचा उदय झाला. हा प्रकार सामूहिक नृत्याच्या स्वरूपात बसवून त्याचे प्रात्यक्षिक आणि मिरवणुकीत सादरीकरण देखील झाले.

सर्व गटाने मिळून एकूण अठरा सामूहिक नृत्याची प्रात्यक्षिके, पाच मिरवणुका आणि चार ठिकाणी अथर्वशीर्ष पठण केले.

**❊ विक्री उपक्रम**

मुलींमधील विक्री कौशल्य आणि संवाद कौशल्य वाढावी आणि उद्योजकता विकसित होण्याच्या दृष्टीने अनुभव व प्रोत्साहन मिळावे यासाठी युवती विभागातून विक्री उपक्रम ५ वी ते १० वी साठी आयोजित केले जातात. यासाठी प्रशालेय दलावर पथक रचनेतून हा उपक्रम घेतला जातो. ह्यामुळे नेतृत्वगुणांच्या विकसनासाठी प्राधान्य मिळते. यावर्षी दि. २१ ऑक्टोबर २०१२ ते ९ नोव्हेंबर २०२३ या कालावधीत दिवाळीनिमित्त विक्री उपक्रम झाला.

दि. २५ ऑक्टोबर रोजी १०वी विक्री उपक्रमासाठीचे पूर्वतयारी सत्र झाले. या सत्रात मीराताईने उद्योजकता व विक्री कौशल्यांवर मार्गदर्शन करत कामाची विभागणी, अडचणी, कल्पक आणि योग्य निर्णय, गटात काम आणि वेळेचे नियोजन यावर चर्चा घेतली. २५ ऑक्टोबर ते २ नोव्हेंबर या कालावधीत सर्व पथकातील ९ वी–१० वीच्या मुलींनी आपापल्या पथकाचे नियोजन आणि आवश्यक पूर्वतयारी केली. यामध्ये भांडवल मिळवणे, काय विकायचे, त्याच्या किमती, कुठे आणि कोणी विकायचे, साहित्य कुठून विकत घ्यायचे हे ठरवणे, प्रत्यक्ष खरेदी, त्यावर आवश्यक असल्यास काही प्रक्रिया करणे, पथकात कामं वाटून घेणे अशा वेगवेगळ्या गोष्टींचा समावेश केला. प्रत्येक नियोजनाचा आढावा त्या पथकावर काम करणाऱ्या मार्गदर्शिकेने घेतला.

दि. ३ नोव्हेंबर ते ९ नोव्हेंबर या कालावधीत विक्री सप्ताहात संपूर्ण दिवस विक्री करण्याचा अनुभव ५ वी ते १० वी मुलींनी घेतला. पुण्यातील विविध भागात घरोघरी जाऊन, स्टॉल लावून, वैयक्तिक संपर्क करून, तसेच ऑनलाईन माध्यमातून विक्री केली. यामध्ये पूजा साहित्य, आकाशकंदील, पणत्या, DIY संच, भेट वस्तू, सुशोभनाचे साहित्य, इत्यादीचा समावेश होता. एवढेच नव्हे तर मागील वर्षीच्या पणत्या पुन्हा रंगवून देणे असेही केले. पथकात काम करताना विक्री कशी करायची, ग्राहकाशी कसे बोलायचे, आपले हिशोब कसे लिहायचे याबद्दल गटात चर्चा झाली. आवश्यक मदत १० वी मुलींनी केली. याशिवाय रोजचे सर्व हिशोब पूर्ण करणे, नोंदी ठेवणे, साहित्य विकत आणणे, मुलींमध्ये वाटणे, स्टॉल लावणे यात ९ वी – १० वीच्या मुलीनी सहभाग घेतला. या विकी उपक्रमातून सर्व पथकांनी मिळून १ लाख, ४५ हजार एवढा नफा कमावला.

**❊ शिबिरे**

**१. क्रीडा शिबिर**

२४ ते २९ डिसेंबर या कालावधीत पाचवी ते नववी मुलींसाठी क्रीडा शिबिर झाले. शिबिराचा मुख्य विषय विविध प्रकारचे खेळ असा होता. संचलन, पद्यगायन, व्यायाम व चार तास खेळ असे नियोजन होते. यासोबत योगासने, कलरीपयट्टू प्रशिक्षणाची सत्रे झाली. पाचव्या दिवशी पथकशः क्रीडा स्पर्धा झाल्या.

शिबिराच्या शेवटच्या दिवशी घनगड, लोहगड, रोहिडा, कुर्डूगड या गडांवर पथकशः चार सहली एकाच दिवशी झाल्या.

**※ वर्गसहल**

दि. २७ व २८ जुलै रोजी इ.१० मुलींची वर्षा सहल अंधारबन येथे नेली होती. एकूण सहभागी मुलींची संख्या ३८ तर मार्गदर्शिकांची संख्या ७ होती. या सहलीच्या निमित्ताने लहान गावात लोक कसे रहातात, त्यांची उपजीविका कशावर अवलंबून असते, सार्वजनिक वाहतूक सेवा कशा असतात, या सर्व गोष्टींचा मुलींना प्रत्यय आला.

१२-१३ ऑगस्ट रोजी ८ वी मुलींची राजगड येथे निवासी सहल झाली.

इयत्ता पाचवी मुलींची वर्गसहल शिवनेरी गडावर ९ डिसेंबर २०२३ रोजी झाली.

**※ गिर्यारोहण**

कमलाबाई दलातील ९ वीच्या मुलींनी ९ आणि १० फेब्रुवारी मध्ये कात्रज ते सिंहगड नाईट ट्रेक केला. चांदण्याच्या प्रकाशात, एकमेकींना मदत करत १४ किलोमिटर अंतर आणि १५ टेकड्या सर केल्या.

या सहलीत २९ मुली आणि ७ मार्गदर्शिका सहभागी झाल्या. स्वतःच्या क्षमतांचा कस बघत आणि आपल्याला सिंहगडाला पोहोचायचंच आहे, या निश्चयाने उत्तम गटकार्याचा सगळ्यांनी अनुभव घेतला

# ६. नेतृत्व गुणविकसन

## ६.१ अग्रणी शिबिर

दि. २७ व २८ नोव्हेंबर २०२३ इ. ९वी मुलामुलींसाठी दोन दिवसाचे अग्रणी प्रशिक्षण शिबिर आयोजित करण्यात आले. शिबिराची सुरुवातीला नेतृत्वाची संकल्पना व गटबांधणी यावरील सत्र मा. प्राचार्य मिलिंदराव नाईक यांनी घेतले. नेतृत्वासाठी पुढाकार घेण्याची वृती अत्यावश्यक असते, असे सांगून पुढे त्यांनी नेत्यास गटबांधणी कशी करावी लागते हे एका चित्रपटाच्या आधारे समजावले .

नियोजन कौशल्य या विषयावर श्रेयशदादा फापाळे याने मुलांकडे व मीराताई शेटे हिने मुलींकडे सत्र घेतले. नचिकेतदादाने विवेकानंदाचे नेतृत्वगुण या विषयावर लेख वाचून चर्चा घेतली. 'गटात काम करताना' या विषयी प्रज्ञाताई अक्कलकोटकर यांनी मुलींना व संकेतदादा भंडारे यांनी मुलांना मार्गदर्शन केले. रागिणीताईंनी दोन्ही वर्गांना अग्रणी योजना समजावून सांगितली व त्यांच्या जबाबदाऱ्या जाहीर केल्या. त्यानंतर जबाबदाऱ्यांनुसार गटश: कामाचे नियोजन करून घेतले .

## ६.२ गुरुपौर्णिमा कार्यक्रम

| वर्ग | दिनांक | व्यक्ती | विषय |
|---|---|---|---|
| ५ वी मुले | ४ जुलै २३ | अनघाताई लवळेकर | 'गुगल गुरू' आणि 'मानवी गुरू' |
| ५ वी मुली | ३ जुलै २३ | वाच. मनीषाताई शेटे | गुरू-शिष्यांच्या गोष्टी |
| ६ वी मुले | ३ जुलै २३ | आदित्यदादा शिंदे | गुरू-शिष्य नाते |
| ६ वी मुली | ८ जुलै २३ | बागेश्रीताई पोंक्षे | ताईंनी त्यांच्या प्रबोधिनीतील आदरणीय गुरूविषयी सांगितले. |
| ७ वी मुले | ४ जुलै २३ | प्रशांत दिवेकर | 'असति का ऐसे कुणी?' |
| ७ वी मुली | ५ जुलै २३ | सुवर्णाताई गोखले | गुरू आणि शिष्य यातील फरक |
| | | डॉ. माधुरीताई केळकर | शंकराचार्य लिखित गुरुअष्टकातील गुरू-शिष्य नाते |
| ८ वी मुले | | मा. संचालक | 'गुरुर्ब्रह्मा' श्लोकाचा अर्थ, शिवाय concern, connectedness आणि compentence ह्या तीन गुणांचे महत्त्व सांगितले. |
| ८ वी मुली | ४ जुलै २३ | अजितराव कानिटकर | शालेय जीवनातील विविध अनुभव |
| ९ वी मुले | | | |
| ९ वी मुली | ४ जुलै २३ | मनोजराव देवळेकर | गुरू कसा असावा, गुरुपर्यंत कसे पोहोचावे |
| १० वी मुले | | वाच. मिलिंदराव नाईक | गुरूचे महत्त्व |
| १० वी मुली | | सुभाषराव देशपांडे | प्रबोधिनीचे तत्त्वसप्तक |

## ६.४ सरस्वतीपूजन –

प्रमुख अतिथी – मा. प्रशांत दिवेकर

दि. १९ ऑक्टोबर २३ रोजी इयत्ता ५ वी ते ७ वी मुले आणि मुली यांच्या वर्गावर सरस्वती पूजनाचा कार्यक्रम झाला. या कार्यक्रमाचे इयता १० वीच्या वर्गाने आयोजन केले होते. भारतीय संस्कृतीमध्ये सापडणाऱ्या रंगांच्या वैविध्याबद्दल बोलून मा. प्रशांत सरांनी बोलण्याची सुरुवात केली. एखादी कृती करण्यामागे काय प्रेरणा असते; ती प्रेरणा आणि ऊर्जा समजून घेण्याचे पर्व म्हणजे नवरात्री. अशी ऊर्जा आपल्याला अनेकवेळा आपल्या आजूबाजूला दिसत असतेच – अगदी नुकत्याच झालेल्या भारत–पाकिस्तानच्या क्रिकेट सामन्यावेळी अनेकांनी एकाचवेळी 'वंदे मातरम्' म्हणतानासुद्धा ती जाणवली. तिथे भारतमातेची मूर्ती आपल्यासमोर येते – हे भारतमातेचे चित्र कालपरत्वे बदलत गेले. महिलांच्या कर्तृत्वाचे रुप आपण दोन प्रकारे पाहतो – साध्वी रूपामध्ये आणि समृद्धीच्या रूपामध्ये.

पुस्तक– ज्ञानाचे प्रतीक, भाताच्या ओंब्या– समृद्धीचे प्रतीक, कापड – श्रमातून येणाऱ्या संपन्नतेचे प्रतीक, जपमाळ – आपण ऊर्जेचा विचार कसा करावा याची आठवण करून देणारे प्रतीक अशी भारतमाता साध्वी स्वरूपात दिसते. एका बाजूला शांत, शीतल सरस्वती आणि दुसऱ्या बाजूला उग्र काली अशा दोन्ही प्रकारे नवरात्रात आपण देवीचे स्मरण करतो.

आसाममध्ये साजरा होणारा नवरात्रीचा उत्सव कसा साजरा होतो आणि त्यामागचा विचार काय हेही सरांनी सांगितले.

आपण ज्या गुणांची आठवण करतो त्यानुसार देवीची विविध रूपे आपल्या डोळ्यासमोर येतात. आणि ते आपल्यात यावेत यासाठी आपण असे विशेष दिवस साजरे करतो. त्यामुळे पूजनाबरोबरच प्रत्यक्ष कृती करून सरस्वतीला नमन करण्याचा आजचा दिवस आहे.

श्रीदेवी, भूदेवी, अन्नपूर्णा या तीन रूपांचे चिंतन आपण करत राहिलो तर जी ऊर्जा आपल्याला पाहिजे तिचे चिंतन करण्यासाठी आणि ती मिळवण्यासाठी प्रयत्न करता येतील. आपल्यातल्या ऊर्जेचे जतन करण्यासाठी सरांनी शुभेच्छा दिल्या.

सरांच्या मार्गदर्शनाच्या आधी प्रत्येक वर्गाच्या प्रतिनिधी, मा. पर्यवेक्षिका आणि मा. अतिथी यांच्या हस्ते सरस्वती पूजन झाले.

## ६.४ स्वामी विवेकानंद जयंती – युवा दिन कार्यक्रम

दि. १२ जानेवारी २०२४, स्वामी विवेकानंद जयंती व युवादिनानिमित्त ज्ञान प्रबोधिनी प्रशालेत स्वामी विवेकानंदांचे स्मरण करण्यात आले. प्रार्थनेच्या वेळी झालेल्या सभेत मुलांसमोर वाच. सौगंध देशमुख यांनी विवेकानंदांच्या विचारांचे कृतीत रूपांतर करणे म्हणजे त्यांना खरी आदरांजली अर्पण करणे आहे, असे सांगितले. यावेळी 'स्मृतीतून स्फुरो कृती ' या स्वामीजींच्या वचनांवर आधारित पुस्तिकेतील उताऱ्यावर इ. ९वीतील स्तवन कामतकरने त्याचे विचार व्यक्त केले .

मुलींच्या गटाशी बोलण्यास श्रीमती प्राचीताई परांजपे आल्या होत्या. त्यांनी स्वामी विवेकानंदांच्या गोष्टी सांगत देश फिरून बघितल्याने त्यातील समस्या लक्षात येतात, त्याकरिता डोळसपणे पर्यटन केले पाहिजे असे सांगितले.

त्यानंतर इ. ५ वी व ६ वीच्या विद्यार्थ्यांनी व विद्यार्थिनींनी सूर्यनमस्कार घातले व योगासने केली . इ. ९ वी विद्यार्थी व विद्यार्थिनींसाठी स्वामी विवेकानंदांचे जीवन व क्रीडाक्षेत्र या दोन विषयांवर प्रश्नमंजुषा घेण्यात आली. या सर्व कार्यक्रमाचे आयोजन इ. ९वीच्या अग्रणींनी केले होते .

## ६.५ अग्रणी तासिका

संवाद, स्वयंअध्ययन, सादरीकरण, गटकार्य व गटबांधणी या कौशल्यांचा विकास होण्याकरिता दर शुक्रवारी अग्रणी आपापल्या वर्गांवर एक तासिका घेतात. शारीरिक, भावनिक, बौद्धिक, सामाजिक विकसन व प्रबोधिनीपण या विषयांवर तयारी करून अग्रणींनी वर्षभर आपल्या वर्गासमोर मांडणी केली. दृकश्राव्य साधने, गटकार्य, गटचर्चा, व्याख्यान इ. माध्यमांचा वापर त्यांनी यावेळी केला. याबरोबरच आपल्या वर्गांचे सहाध्यायदिन योजण्यात अध्यापकांना मदत केली.

# ७. अध्यापक प्रशिक्षण व बैठका

## अध्यापक प्रशिक्षण शिबिर (८ ते १० जून २०२३)

दि. ८ ते १० जून २०२३ दरम्यान प्रशालेचे नवीन शैक्षणिक वर्ष चालू होत असताना संपूर्ण अध्यापक संचासाठी 'अध्यापक प्रशिक्षण शिबिर' आयोजित केले होते. त्यादरम्यान आयोजित केलेल्या विशेष मार्गदर्शन सत्रात वाच. मुकुलिकाताई थत्ते यांनी ज्ञानरचनावाद या विषयावर मार्गदर्शनपर सत्र घेतले. मा. महेंद्रभाई सेठिया यांनी 'विद्यार्थ्यांचे प्रेरणाजागरण' याविषयी मार्गदर्शन केले.

तांत्रिक प्रशिक्षणांतर्गत २०२३-२४ या शैक्षणिक वर्षांपासून प्रशालेमध्ये वापरण्यात येणाऱ्या स्मार्ट बोर्ड्सच्या वापराबद्दलचे प्रशिक्षण 'सेन्स एज'मार्फत दिले गेले आणि विषयश: बैठकीही घेण्यात आल्या.

## ७.१ अध्यापक प्रशिक्षणे

*** बाल दुर्वर्तन –ऑनलाइन बैठक**

दि. – १४ ऑक्टोबर २०२३ रोजी बाल लैंगिक दुर्वर्तन या विषयावर बैठक झाली. त्यात तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले.

वक्त्या – डॉ. अनघा लवळेकर व डॉ. वैशाली देशमुख

उपस्थित सदस्य – शिक्षक, कर्मचारी व अन्य सदस्य ज्ञान प्रबोधिनी प्रशाला

या बैठकीचे नियोजन ऑनलाइन पद्धतीने केले होते. सुरुवातीला क्षमांगीताई यांनी ज्ञान प्रबोधिनी प्रज्ञा मानस केंद्र, स्त्री शक्ती प्रबोधन केंद्र व बजाज आलायन्स यांच्या संयुक्त विद्यमाने राबवण्यात येणाऱ्या 'ओळख स्पर्शाची ३६००' या प्रकल्पाविषयी ओळख व माहिती करून दिली. त्यानंतर प्रमुख वक्त्यांचा परिचय करून दिला. मा. अनघाताई लवळेकर यांनी त्यांच्या मांडणीत मुलांचे भावनिक व मानसिक विश्व, त्यांची संबंधित व्यक्तींशी व व्यक्त होण्याची पद्धत, मुलांचे वाढीचे टप्पे अशा अनेक मुद्द्यांवर लक्ष वेधले. मुलांशी कसे वागावे व या संबंधित कायदे नियम वैशालीताई देशमुख यांनी स्पष्ट केले. बालहक्कांबद्दल माहिती दिली. लैंगिक दुर्वर्तनाची व्याख्या स्पष्ट केली आणि यामध्ये आता ऑनलाइन शोषणाची भर पडली आहे हे नमूद केले. दुर्वर्तन वाढण्यामागची कारणे, जसे की प्रसार माध्यमांचा प्रभाव, अनेक अंधश्रद्धा, मानसिक आजार अथवा विकृती, प्रेम संकल्पनेतील गैरसमज, व्यसनाधीनता, कायद्याबद्दल अज्ञान इ . चे स्पष्टीकरण दिले आणि याचा दूरगामी होणारा परिणाम समजावून सांगितला. विद्यार्थ्यांबरोबर कोठेही, कसेही, कोणाकडूनही घडू शकते. दुर्वर्तन घडू नये म्हणून विशेष घ्यावयाची काळजी अधोरेखित केली. प्रामुख्याने पॉक्सो २०१२ म्हणजेच पीडित बाल लैंगिक संरक्षण कायदा याबद्दल अनघाताईंनी विस्तृत माहिती दिली. मुलांना आपली तक्रार नोंदवण्यासाठी शासनाने ई बॉक्स ही सुविधा दिली आहे, हे स्पष्ट केले. लैंगिक शोषणाची घटना घडली असल्यास काय करावे हे स्पष्ट केले. एखादी घटना घडण्याआधी घ्यावयाची काळजी म्हणजेच मुलांचे प्रशिक्षण, कर्मचारी, इतर गटाचे प्रशिक्षण, कडेकोट इंटरनेट सुरक्षा, समाज माध्यमांवर मैत्री करण्याचे निकष अशा मुद्द्यांवरसुद्धा भाष्य केले. कर्मचारी भरती करतानाची नियमावली समजावून दिली. मुलांच्या सुरक्षिततेसाठी काय काय आवश्यक आहे ते समजावून सांगितले. शाळा तक्रार समिती स्थापन करण्याचे महत्त्व स्पष्ट केले. मुलांना तक्रार करण्यास सोपे

जावे यासाठी तक्रार पेटी असावी, पोलीस काका क्रमांक, चाईल्ड  हेल्प लाईनविषयी माहिती शाळेमध्ये ठळकपणे लावावी असे सांगितले. मुलांच्या मुक्त विकासासाठी त्यांच्या भावनिक गरजा समजून घेणे, त्यांना बोलू देणे, व्यक्त होऊ देणे आवश्यक आहे, हे पुन्हा पुन्हा नोंदवले. या उपक्रमावर आधारित एक प्रतिज्ञा सर्वांनी एकत्रित म्हणून या ऑनलाईन बैठकीचा समारोप झाला.

## ७.२ साप्ताहिक बैठका

## ७.३ मध्यवर्ती सहाविचार बैठक

**चर्चिलेले विषय :**

१. आचार्यवत

२. SQ

३. OSIS Affiliation Renewal

४. प्रशाला अभ्यासक्रम विषय भर / बदल

५. अध्यापक / कर्मचारी

६. मूल्यमापन, वेतनवाढ

७. विस्तार कार्यात प्रशालेचा सहभाग – प्रशिक्षण / संशोधन

**७.२ प्रशाला सहविचार बैठका –** साप्ताहिक सहविचार बैठकांमध्ये पुढील विषयांवर चर्चा झाली.

| विषय | |
|---|---|
| १. CCE evaluation | ९. प्रथम सत्रातील निकाल |
| २. नवीन नियुक्ती | १०. अध्यापन प्रशिक्षण |
| ३. खाते वाटप चर्चा | ११. फिजिकल फिटनेस टेस्ट |
| ४. पालक बैठक | १२. १० वी विद्यार्थी/(Aptitude Test) |
| ५. १५ ऑगस्ट नियोजन | १३. ५वी प्रवेश परीक्षा नियोजन |
| ६. गणेशोत्सव नियोजन | १४. CCE कामाचे नियोजन |
| ७. SQAA बैठक | १५. CCE व CBE |
| ८. ओळख स्पर्शाची वेबिनार | |

**७.५ शाळा व्यवस्थापन समिती बैठक**

| विषय | |
|---|---|
| १. कार्यवृत्त सादरीकरण व चर्चा | ८. आर्थिक अंदाज पत्रक |
| २. कार्यसंकल्प सादरीकरण व चर्चा | ९. SQAA विषयी निवेदन |
| ३. अर्थवृत्त व अर्थसंकल्प सादरीकरण व चर्चा | १०. तांत्रिक विषय |
| ४. पुढील ३ महिन्यांचे नियोजन | ११. सफल परीक्षा |
| ५. नवीन नियुक्ती – निर्गमन चर्चा | १२. शिक्षक मूल्यमापन |
| ६. आयत्या वेळचे विषय | १३. आयत्या वेळचे विषय |
| ७. मागील बैठकीचे वृत्त | |

**७.६ पालक बैठका –** वर्षभरात झालेल्या बैठका खालीलप्रमाणे –

पहिल्या सत्रात सर्व वर्गाच्या पालक बैठका झाल्या. या बैठकांमध्ये अध्यापक परिचय, वार्षिक नियोजन, मूल्यमापन, स्तर पद्धती, एस.आय.जी. युवक-युवती दल, प्रशाला उपक्रमांची माहिती देण्यात आली.

दुसऱ्या सत्रातील पालक बैठकी प्रत्येक वर्गाबरोबर महिना अखेरच्या दिवशी 'मुक्त संवाद दिन' या स्वरूपात झाली. या बैठकीमध्ये पालकांनी विषय अध्यापकांशी प्रत्यक्ष संवाद साधून विषयशः आपल्या पाल्याच्या प्रगतीचा आढावा घेतला.

### ७.८ पालक–शिक्षक संघ –

१. वार्षिक नियोजन

२. पालक शिक्षक संघ प्रतिनिधी निवड

३. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण

४. SQAA

५. शुल्कवाढ ठराव

६. अर्थ संकल्प, अर्थ वृत्त

७. सफल परीक्षा

# ८. यश

## ८.१ शालान्त परीक्षा – इ. १०वी निर्णय

ज्ञानप्रबोधिनी प्रशालेचा इयत्ता दहावीचा निकाल निर्णय जाहीर झाला आहे.
प्रशालेचा निकाल शंभर टक्के लागला आहे.

**कु. रमा मंदार जोशी ही विद्यार्थिनी ९८.४ % गुण मिळवून तुकडीमध्ये प्रथम आली.**

| | | |
|---|---|---|
| कु. उर्विका सतीश खाडे | (९८.२%) | द्वितीय क्रमांक |
| कु. आयुषी हृषीकेश राजहंस | (९८.२%) | द्वितीय क्रमांक |
| कु. पलाश प्रद्युमन पैरायतूरकर | (९८.२%) | द्वितीय क्रमांक |

| | |
|---|---|
| परीक्षेस बसलेले एकूण विद्यार्थी | – ७९ |
| उत्तीर्ण विद्यार्थी | – ७९ |
| शालेय सरासरी | – ९३.९६% |

| | |
|---|---|
| ९५% पेक्षा अधिक गुण मिळवणारे विद्यार्थी | – ३८ |
| ९०% पेक्षा अधिक गुण मिळवणारे विद्यार्थी | – ७३ |
| ८०% पेक्षा अधिक गुण मिळवणारे विद्यार्थी | – ७९ |

**विषयश: पैकीच्या पैकी गुण मिळवणारे विद्यार्थी**

| | |
|---|---|
| संस्कृत | – १०० पैकी १०० – २९ विद्यार्थी |
| गणित | – १०० पैकी १०० – ८ विद्यार्थी |
| सामाजिक अध्ययन | – १०० पैकी १०० – ३ विद्यार्थी |

**विषयश: सरासरी –**

| | | |
|---|---|---|
| संस्कृत – ९८.५८% | सामाजिक अध्ययन – ९३.६७% | विज्ञान – ९१.४८% |
| इंग्रजी – ९२.८७% | गणित – ९३.२१% | |

## ८.२ बाह्यपरीक्षांतर्गत

### महाराष्ट्र शासन शिष्यवृत्ती परीक्षा

महाराष्ट्र शासनातर्फे घेण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती परीक्षेत प्रशालेतील पुढील विद्यार्थ्यांनी गुणवत्ता यादीत स्थान पटकावले.

**पूर्व प्राथमिक (इयत्ता ५ वी – सीबीएसई – ८ वा क्रमांक)**

| | |
|---|---|
| १. स्वरा ढाकणे | २. काव्या सरोदे |
| ३. नारायणी पुराणिक | ४. हिरण्मयी सप्रे |

### होमी भाभा बाल वैज्ञानिक स्पर्धा (फेरी १)

| | | |
|---|---|---|
| इरा जोशी | इ. ७ वी | रौप्य पदक |
| अनन्या जाधव | इ. ७ वी | कांस्य पदक |
| शामली मगर | इ. ७ वी | सुवर्ण पदक |
| सई लिमये | इ. ७ वी | कांस्य पदक |
| अनन्या आठल्ये | इ. ८ वी | कांस्य पदक |
| आर्या मंदाडे | इ. ८ वी | रौप्य पदक |
| पूर्वा जोशी | इ. ८ वी | सुवर्ण पदक |
| संस्कृती जरे | इ. ८ वी | सुवर्ण पदक |

### डॉ. होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धा (स्तर २)

| | | |
|---|---|---|
| नारायणी पुराणिक | इ. ६ वी | प्रथम क्रमांक |

### गणित प्रभुत्व

गणित प्रभुत्व परीक्षा स्तर – १ मधे ७५ टक्केपेक्षा जास्त गुण मिळवून इयत्ता पाचवीचे २३ आणि इयत्ता आठवीचे २० विद्यार्थी / विद्यार्थिनी स्तर – २ साठी पात्र ठरले.

### गणित प्रभुत्व परीक्षा स्तर २ रिझल्ट
### भास्कराचार्य Mathematics Talent Search Competition

भास्कराचार्य Mathematics Talent Search Competition मधे प्रशालेतील खालील विद्यार्थ्यांनी पहिल्या २४ विद्यार्थ्यांमध्ये स्थान मिळवून बक्षीस मिळविले.

| | |
|---|---|
| अथर्व जुवेकर | इ. ६ वी |
| अंगद जोशी | इ. ६ वी |
| स्वरा ढाकणे | इ. ६ वी |
| गार्गी पाटील | इ. ६ वी |
| अनिर्वाण बुटाला | इ. ५ वी |

## स्कॉलरशिप, मेडल आणि प्रशस्तिपत्र मिळविणारे विद्यार्थी

### इयत्ता ८ वी

| | |
|---|---|
| अवनी भट्टड | स्कॉलरशिप, मेडल आणि प्रशस्तिपत्र |
| रचिता चौगुले | मेडल आणि प्रशस्तिपत्र |
| अदिती देशपांडे | मेडल आणि प्रशस्तिपत्र |
| निनाद गोडबोले | मेडल आणि प्रशस्तिपत्र |
| आर्यन पवार | मेडल आणि प्रशस्तिपत्र |
| वरद फाळके | मेडल आणि प्रशस्तिपत्र |
| अवनी बनकर | प्रशस्तिपत्र |
| अथर्व भिडे | प्रशस्तिपत्र |
| दृमिल धांडे | प्रशस्तिपत्र |
| प्रथम ढोकले | प्रशस्तिपत्र |
| संस्कृति जरे | प्रशस्तिपत्र |
| तेजस खोत | प्रशस्तिपत्र |
| सलिल सरदेशपांडे | प्रशस्तिपत्र |

### इयत्ता ५ वी

| | |
|---|---|
| राज गुजर | स्कॉलरशिप, मेडल आणि प्रशस्तिपत्र |
| निशित वाव्हळ | स्कॉलरशिप, मेडल आणि प्रशस्तिपत्र |
| अनिर्वाण बुटाला | मेडल आणि प्रशस्तिपत्र |
| नुपूर कुलकर्णी | मेडल आणि प्रशस्तिपत्र |
| यश लिमये | मेडल आणि प्रशस्तिपत्र |
| अभिर विभूते | मेडल आणि प्रशस्तिपत्र |
| सृजा देशपांडे | प्रशस्तिपत्र |
| श्रीजीत हडवाले | प्रशस्तिपत्र |
| ईशान कदम | प्रशस्तिपत्र |
| अनिका कर्वे | प्रशस्तिपत्र |
| मिहिर कुलकर्णी | प्रशस्तिपत्र |
| गौरी कुलकर्णी | प्रशस्तिपत्र |
| अबीर निसळ | प्रशस्तिपत्र |

## ८.३ स्पर्धांतर्गत

**All India Tennis Association (AITA) Championship Series टेनिस स्पर्धा**

| | | |
|---|---|---|
| सर्वज्ञ सरोदे | इ. ८ वी | विजेता |

**डॉ. कलमाडी शामराव हायस्कूल – बाल संगीत नृत्य महोत्सव**

**क्लासिकल व्होकल – ज्युनिअर कॅटेगरी**

| | | |
|---|---|---|
| मुक्ता साठे | इ. ८ वी | प्रथम पारितोषिक |

**नाट्यसंगीत – सीनिअर कॅटेगरी**

| | | |
|---|---|---|
| निनाद गोखले | इ. ८ वी | तृतीय पारितोषिक |

**भक्तिगीत – ज्युनिअर कॅटेगरी**

| | | |
|---|---|---|
| अवनी भाले | इ. ८ वी | तृतीय पारितोषिक |

**आनंदाश्रम संस्था स्तोत्र पाठांतर व प्रश्नमंजूषा स्पर्धा**

**गट – ५ वी, ६ वी**

| | | |
|---|---|---|
| नारायणी पुराणिक | इ. ६ वी | प्रथम क्रमांक |
| जुई टेंबे | इ. ६ वी | चतुर्थ क्रमांक |

**आनंदाश्रम संस्था स्तोत्र पाठांतर व प्रश्नमंजूषा स्पर्धा**

**गट – ९ वी, १० वी**

| | | |
|---|---|---|
| गौरीप्रिया कंदकटला | इ. १० वी | चतुर्थ क्रमांक |

**आनंदाश्रम संस्था स्पर्धा प्रश्नमंजूषा**

| | | |
|---|---|---|
| इरा कुलकर्णी | इ. १० वी | द्वितीय क्रमांक |
| गौरीप्रिया कंदकटला | इ. १० वी | द्वितीय क्रमांक |

**महाराष्ट्र प्रज्ञाशोध**

| | | |
|---|---|---|
| आयुषी राजहंस | इ. १० वी | चतुर्थ क्रमांक (जिल्हास्तर) |

## डेक्कन एज्युकेशन सोसायटी – पोवाडा गायन स्पर्धा

| | | |
|---|---|---|
| मुक्ता साठे | रेवा क्षीरसागर | सिद्धी खेडकर |
| जुई काळे | सई कृष्णकुमार | आराध्या जरे |
| नारायणी पुराणिक | हिरण्मयी सप्रे | सिद्धी वाघोले |
| आराधना देशमुख | हिरण्या शेजवळ | |

## संस्कृतभारती आयोजित राज्यस्तरीय सुभाषिताभियानम् स्पर्धा

| | | |
|---|---|---|
| नारायणी पुराणिक | इ. ६ वी | प्रथम क्रमांक |

## अभिवाचनाची संधी

अनन्या आठल्ये इ. ८ वी हिने वीणा गवाणकर लिखित ‘किमयागार कार्व्हर’ या पुस्तकातील काही भागांचे अभिवाचन या पुस्तक प्रकाशनाच्या निमित्ताने केले.

## महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा – नाट्यवाचन स्पर्धा

| | |
|---|---|
| इरा जोशी | इ. ७ वी |
| स्वरा गिजरे | इ. ७ वी |
| आर्या खेडकर | इ. ६ वी |
| सई आंबेकर | इ. ६ वी |
| अन्वय जोगळेकर | इ. ८ वी |
| निनाद गोखले | इ. ८ वी |
| प्रथम ढोकले | इ. ८ वी |
| अथर्व भिडे | इ. ८ वी |

**❊ विशेष उल्लेखनीय ❊**

लहान गट – प्रथम पारितोषिक

उत्तम दिग्दर्शन पारितोषिक – अंजली कर्वे

## लोकमान्य टिळक वक्तृत्व स्पर्धा

**✻ हिन्दी लहान गट ✻**

| | | |
|---|---|---|
| विहान झापकर | इ. ५ वी | प्रथम क्रमांक |

**✻ मराठी लहान गट ✻**

| | | |
|---|---|---|
| आर्या खेडकर | इ. ६ वी | प्रथम क्रमांक |

**✻ मराठी मध्यम गट ✻**

| | | |
|---|---|---|
| प्रथम ढोकले | इ. ८ वी | उत्तेजनार्थ |

**✻ इंग्रजी लहान गट ✻**

| | | |
|---|---|---|
| सई आंबेकर | इ. ६ वी | द्वितीय क्रमांक |

**✻ इंग्रजी मध्यम गट ✻**

| | | |
|---|---|---|
| निनाद गोखले | इ. ८ वी | द्वितीय क्रमांक |

**✻ शिक्षक गट ✻**

| | | |
|---|---|---|
| श्रेयश फापाळे | | प्रथम क्रमांक |

## आंतरशालेय वक्तृत्व स्पर्धा

**कनिष्ठ गट**

**✻ मराठी नियोजित ✻**

| | | |
|---|---|---|
| नारायणी पुरणिक | इ. ६ वी | द्वितीय परितोषिक |

**✻ हिंदी कविता पाठांतर ✻**

| | | |
|---|---|---|
| विहान झापकर | इ. ५ वी | सहावा क्रमांक |

**✻ इंग्रजी कविता पाठांतर ✻**

| | | |
|---|---|---|
| अनिका कर्वे | इ. ५ वी | पाचवा क्रमांक विभागून |

**✻ कथाकथन ✻**

| | | |
|---|---|---|
| स्पृहा साठे | इ. ५ वी | प्रथम क्रमांक |
| अदिती गोसावी | इ. ६ वी | द्वितीय क्रमांक |

**✻ समयस्फूर्त ✻**

| | | |
|---|---|---|
| सई आंबेकर | इ. ६ वी | प्रथम क्रमांक |

**मध्यम गट**

**✻ हिंदी नियोजित ✻**

| | | |
|---|---|---|
| अनन्या आठल्ये | इ. ८ वी | प्रथम क्रमांक विभागून |

**✻ इंग्रजी नियोजित ✻**

| | | |
|---|---|---|
| निनाद गोखले | इ. ८ वी | प्रथम क्रमांक |

**✻ हिंदी कविता पाठांतर ✻**

| | | |
|---|---|---|
| स्वरा गिजरे | इ. ७ वी | चतुर्थ क्रमांक |

**✻ इंग्रजी कविता पाठांतर ✻**

| | | |
|---|---|---|
| निनाद गोखले | इ. ८ वी | चतुर्थ क्रमांक |

**✻ समयस्फूर्त ✻**

| | | |
|---|---|---|
| प्रथम ढोकले | इ. ८ वी | पाचवा क्रमांक |
| अन्वय जोगळेकर | इ. ८ वी | सहावा क्रमांक |

**वरिष्ठ गट**

**✻ इंग्रजी नियोजित ✻**

| | | |
|---|---|---|
| निआ भुर्के | इ. ९ वी | पाचवा क्रमांक विभागून |

## स्कूलिपिंक्स सायकलिंग स्पर्धा

| | | |
|---|---|---|
| चैतन्य बोरोले | इ. ९ वी | तृतीय क्रमांक आणि ब्राँझ मेडल |

## स्टुडंट सायन्स व्हिलेज कार्यशाळा

| | |
|---|---|
| सर्वेश कोल्हे | इ. ७ वी |
| सई दंताळे | इ. ९ वी |
| अनाहिता जोशी | इ. १० वी |

## निवड प्रक्रिया

## आयरिस नॅशनल फेअर, नवी दिल्ली

| | | |
|---|---|---|
| तेजश्री मराठे | इ. १० वी | इन्वेस्टिगेशन ऑफ डिलेड ड्रॉपलेट कोलसेन्स |
| जुई भडकमकर | इ. १० वी | |
| श्रेयस अभ्यंकर | इ. १० वी | इफेक्ट ऑफ फीडिंग यंग लिवस ऑन द ग्रोथ पॅटर्न ऑफ बटरफ्लाय लावी |
| अनुज जोशी | इ. १० वी | |
| शार्दुल कोठी | इ. १० वी | अ नोव्हेल रेजाझुरिन बेस्ड एएमआर प्रीडिकटीव टेस्ट |
| ध्रुव बढे | इ. १० वी | |

## सृजन वाक् यज्ञ स्पर्धा

| | | |
|---|---|---|
| श्रीजित ढेकणे | इ. ९ वी | प्रथम पारितोषिक |

## शिवसृष्टी व क्लब हेरिटेज यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित सृजन – वाक् स्पर्धा

| | | |
|---|---|---|
| आराधना देशमुख | इ. ६ वी | प्रथम पारितोषिक |
| स्वराली गारडी | इ. ६ वी | द्वितीय पारितोषिक |
| हिरण्मयी सप्रे | इ. ६ वी | द्वितीय पारितोषिक |
| अन्विता अवधूत | इ. ६ वी | द्वितीय पारितोषिक |
| सई कृष्णकुमार | इ. ६ वी | तृतीय पारितोषिक |

## विज्ञान प्रदर्शन, जी एम आर टी खोडद

| | | |
|---|---|---|
| सर्वेश कोल्हे | इ. ७ वी | प्रथम क्रमांक |
| अभिराम देशपांडे | इ. ७ वी | प्रथम क्रमांक |
| ऋषिकेश केदार जोशी | | |
| मिहीर गोडबोले | | |

## केपीआयटी स्पार्कल (अभियांत्रिकी स्पर्धा)

केपीआयटी स्पार्कल अभियांत्रिकी विद्यार्थ्यांसाठी असलेली प्रकल्प स्पर्धा आहे. त्यात प्रशालेतील विद्यार्थ्यांना प्रकल्प सादर करण्याची संधी मिळली.

सर्वेश कोल्हे, अभिराम देशपांडे – प्रकल्प – वर्षारक्षक – Automatic rain shed

मिहीर गोडबोले, ऋषिकेश जोशी – प्रकल्प – पशुरक्षक – At based wild animal detection system.

## यश

**३. एलिफायर**

**पंतप्रधानांची ज्ञान प्रबोधिनी प्रशालेच्या स्टॉलला भेट**

दि. २९ जुलै २०२३ रोजी राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाला तीन वर्षे पूर्ण झाली. या निमित्ताने दिल्ली येथे प्रगती मैदानावर सुरू असलेल्या 'अखिल भारतीय शिक्षा संगम' संमेलनात भारतभरातील निवडक प्रकल्पांचे प्रदर्शन लावले होते. ज्ञान प्रबोधिनी प्रशालेच्या १० वीच्या विद्यार्थ्यांनी 'बायोमिमिक्री' या विषयाअंतर्गत केलेल्या प्रकल्पाची निवड येथे झाली होती.

**प्रकल्पाचे नाव – एलिफायर (आग विझवणारे स्वयंचलित यंत्र )**

ज्ञान प्रबोधिनी प्रशालेच्या या स्टॉलला मा. पंतप्रधान श्री. नरेंद्रजी मोदी यांनी भेट दिली.

**प्रकल्पात सहभागी विद्यार्थी**

| | |
|---|---|
| यश कापसे | इ. १० वी |
| श्लोक दळवी | इ. १० वी |

(राज जैन, श्रीश पाटसकर, मिथिलेश हिंगमिरे, अर्णव वडीकर)

# ९. विशेष दखल

## ९.१ वर्गश: संचालक भेटी

'मनुष्यघडणीसाठी शिक्षण' या उद्दिष्टानुरूप ज्ञान प्रबोधिनी प्रशाला कार्यरत आहे. देशप्रश्न सोडवणारे कार्यकर्ते तयार होण्यासाठी इथली शिक्षणप्रणाली काम करते. हे काम सुरळीत चालू राहावे, यासाठी ज्येष्ठांचे मार्गदर्शन हवेच. आदरणीय संचालक या सर्व कामांची दखल घेत असतात. आदरणीय संचालक प्रशालेतील विद्यार्थ्यांशी संवादही साधतात. यावर्षी संवादात त्यांनी खालील विषयांची मांडणी केली.

**❊ पाचवी मुली**

आपण जयंती कशी साजरी केली पाहिजे, याविषयी चर्चा केली. अभ्यास आणि नवनिर्मितीसाठी पाठांतर किती आवश्यक आहे. नवीन कल्पना, कौशल्यं सतत शिकत राहिली पाहिजेत असे सांगितले व त्यासाठीचे टप्पेही नमूद केले.

**❊ सहावी मुले**

प्रश्न सोडवण्यासाठी व उत्कृष्ट काम होण्यासाठी Trial and error method कशी वापरली गेली पाहिजे यावर मार्गदर्शन केले.

**❊ सहावी मुली**

एकत्र येऊन काम करणं व शिस्त पाळणं, तसेच गणेशोत्सवात एकत्र येऊन वेगवेगळ्या गोष्टी करणे याबद्दल मार्गदर्शन केले. AI आणि मानवी क्रियाशीलता यावर चर्चा केली. FA IL या शब्दाचा First Attempt In Learning हा नवीनच अर्थही सांगितला. प्रबोधन म्हणजे काय, प्रबोधिनीच्या वास्तूच्या रंगाविषयी व इतर धर्मांमध्ये रंगाविषयी असतात तशी बंधनं आपल्या धर्मात का दिसत नाहीत, याबद्दल त्यांनी बोलतं केलं. दोन स्वतंत्र पद्यपुस्तिकांची वैशिष्ट्ये सांगितली. अप्पांचे व्यक्तिमत्त्व कसे होते, फक्त युवकांसाठी असणारी प्रशाला युवतींसाठी कशी सुरू झाली, याबद्दल बोलले.

**❊ आठवी मुले**

इयत्ता दुसरी ते आठवीपर्यंत विविध संकल्प करताना शारीरिक विकास, कौशल्य वृद्धी, मानसिक विकास, बौद्धिक विकास, नैतिक विकास आणि सामाजिक विकास या सगळ्याचा कसा विचार केला जातो या विषयी सविस्तर मार्गदर्शन केले.

**❊ आठवी मुली**

चित्ररूप प्रबोधिनी हे पुस्तक वाचनासाठी देऊन प्रश्न विचारले. तसेच या पुस्तकावर आधारित प्रश्न विचारण्यासाठी वेळ दिला. तसेच प्रबोधिनीची सुरूवात कशी झाली याचा इतिहास सांगितला. 'हे आनंदी गाणे' ह्या पद्याचा अर्थ उलगडताना त्यांनी सांगितले, की आपला आनंद हा सर्व दिशांना पोहोचावा. 'चिदानंदरूप: शिवोऽहं शिवोऽहम् ।' याचे विश्लेषण करून या माध्यमातून जीवनातील चार कौशल्यांच्या महत्त्वाचे प्रतिपादन केले.

**❊ पाचवी मुले**

मोठे/सार्वजनिक उत्सव आपण का साजरे करतो याचे कारण विचारले. प्रश्नोत्तरांमधून चर्चा केली.

संस्कृत/अथर्वशीर्षाबरोबर मराठी अथर्वशीर्ष पठणाची सुरुवात व संगीताच्या तालावर डंबेल्सचा व्यायाम ज्यांच्यामुळे सुरू झाला, त्या हरिभाऊ देसाईंचा उल्लेख केला. हरिभाऊंनी अथर्वशीर्षाचा जो अर्थ दिला आहे, त्यातील अनुचानमवशिष्यम् या शब्दाचा अर्थ ‘ज्याचं शिक्षण अजून चालू आहे’ असा आहे. अजून शिक्षण चालू आहे, मला जे येतं ते मी इतरांना शिकवतो असा विचार करणारा गुरू हा चांगला गुरू असतो, हे सांगितले. ज्ञान प्रबोधिनीचे अध्यक्ष मा. रघुनाथ माशेलकर यांनी हळद व बासमती तांदुळाचे पेटंट कसे मिळवले, याविषयी सांगितले. डॉ. माशेलकरांनी प्रतिभाशाली लेखनाचा प्रकल्प केलेल्या विद्यार्थ्यांशी संवाद साधण्याच्या निमित्ताने कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगातही आपली कल्पकता मरू द्यायची नाही, असे सांगितले होते, याची आठवण सांगितली.

गणेशोत्सवात मुलांनी कोणते नवीन अनुभव घेतले, काय नवीन शिकायला मिळाले, याविषयी मुलांशी

**❊ सातवी मुली**

प्रबोधिनी समजून घेण्यासाठी प्रबोधिनीच्या विविध केंद्रांना भेट दिली पाहिजे याबद्दल बोलले.

**❊ नववी मुले**

प्रबोधिनीची कोणती प्रतिमा आहे आणि ती कशाप्रकारे असायला हवी हे विचारले. २२ जानेवारी रोजी जी आयोध्येमध्ये राम जन्मभूमीची प्रतिष्ठापना होणार आहे ते आपणही इथे साजरे करावे का असा प्रश्न त्यांनी मुलांना विचारला.

**❊ सातवी मुले**

चांगली कार्ये करण्यासाठी आपल्या शक्तीची आपल्याला ओळख होणे आवश्यक आहे, हे उदहरणांसाह सांगून स्पष्ट केले. रम्य कौशल्ये व पूरक कौशल्ये म्हणजे काय हे सांगून त्यातील काही आत्मसात करणे आवश्यक आहे हे सांगितले.

**❊ नववी मुली**

‘स्व’ हे अक्षर सुरुवातीला किंवा शेवटी येणारे वेगवेगळे शब्द मुलींना सांगायला लावले. यातूनच मनस्वी, देहस्वी, तपस्वी, तेजस्वी या चार शब्दांचा क्रमाने अर्थ सांगत विविध उदाहरणे देऊन आपल्या आयुष्याशी असलेला संबंध आ. संचालकांनी स्पष्ट केला.

## ९.२ प्रशालेस मान्यवरांनी दिलेल्या भेटी

**※ अभ्यागत भेट वृत्त**

दि. १७ जून २०२३ रोजी प्रशालेच्या वर्षारंभ उपासनेसाठी डॉ. शांती अशोकन–संचालक, डी. ए. व्ही. ग्रुप ऑफ स्कूल्स, चेन्नई, प्रा. कनकलक्ष्मी सुब्रमण्यम– प्राचार्य, डी. ए. व्ही. पल्लीकरणाई, श्री. कौशिक नागसुब्रमण्यम– अध्यापक, डी. ए. व्ही. चेन्नई ही मंडळी पूर्णवेळ उपस्थित होती. या दरम्यान त्यांनी संस्कार कार्यक्रमांची भूमिका समजावून घेतली. तसेच धडपड प्रयोगशाळा, प्रकल्प पद्धती, अभिव्यक्ती आणि मूल्यमापन पद्धती यासह इतरही उपक्रमांची माहिती घेतली. याबरोबरच शैक्षणिक साधन केंद्र, प्रज्ञा मानस विभाग, माजी विद्यार्थी मंडळ या विभागात भेटी, संवाद झाला. अनेक मान्यवर अभ्यंगतांनी ज्ञान प्रबोधिनीस भेट देऊन प्रशालेतील धडपड प्रयोगशाळा, प्रकल्प पद्धती, संस्कार कार्यक्रम, अग्रणी योजना आणि मूल्यमापन पद्धती अशा प्रयोगांविषयी माहिती घेतली.

**दिनांक** : १२ सप्टेंबर २०२३

**पाहुणे :**

**१. श्री यतीन्द्र शर्मा** (संघ प्रचारक),
अखिल भारतीय सह संगठन मंत्री,
केन्द्र लखनऊ

**२. श्रीराम आरावकर** (संघ प्रचारक),
अखिल भारतीय सह संगठन मंत्री,
विद्या भारती अखिल भारतीय शिक्षा संस्थान

**३. श्री. साद पानसरे,**
हिंद एज्युकेशन अँड सोशल फौंडेशन लीड स्कूल, बावधन

या अभ्यागतांनी ज्ञान प्रबोधिनीस भेट देऊन प्रशालेतील उपक्रमांची माहिती घेतली. धडपड प्रयोगशाळा, प्रकल्प पद्धती, संस्कार कार्यक्रम, अग्रणी योजना आणि मूल्यमापन पद्धती यांविषयी सादरीकरण व प्रश्नोत्तरे झाली. दुपारच्या सत्रात शैक्षणिक साधन केंद्र, प्रज्ञा मानस विभाग येथे भेट दिली.

पाहुण्यांचे स्वागत, प्रबोधिनीबद्दलचे प्रास्ताविक आणि समारोप प्रा. मिलिंद नाईक यांनी केला. मा. संचालकांसोबत काही वेळ संवाद झाला. मा. प्रशांत दिवेकर सरांशीसुद्धा या गटाने संवाद साधला. विद्याभारतीतर्फे प्रबोधिनीला भेट देण्यासाठी आलेला हा दुसरा गट होता. दि. १३ सप्टेंबर रोजी या गटाने निगडी केंद्रास देखील भेट दिली.

**※ दिल्ली शिक्षण विभागाच्या विशेष नियुक्त पथकाचे ज्ञानप्रबोधिनीत प्रशिक्षण**

**पुणे** : दिल्ली सरकारतर्फे 'अभिषिक्त' या नावाने विशेष क्षमतावान विद्यार्थ्यांसाठी १५ केंद्रे सुरू करण्यात येणार असून त्यात त्यांच्या क्षमता संवर्धनासाठी विशेष योजना असणार आहेत. ज्ञान प्रबोधिनी गेली सुमारे ६० वर्षे याच प्रकारचे काम करीत आहे. त्यामुळे ज्ञान प्रबोधिनीचे याविषयातील अनुभव, उपक्रम जाणून

घेण्यात या पथकाने विशेष रुची दाखवली.

दिल्ली शिक्षण विभागाच्या माजी उपसंचालिका निरूपमा अभ्यंकर यांच्या पुढाकारातून दिल्ली शिक्षण विभागाचे उपसंचालक डॉ. सुधाकर गायकवाड आणि दिल्लीच्या 'अभिषिक्त' प्रकल्पाच्या विशेष कार्यकारी अधिकारी उषा राणी यांच्या नेतृत्वाखाली दिल्ली सरकारच्या शिक्षण विभागातील निवडक ३० शिक्षक आणि काही पदाधिकारी दि. १९ फेब्रुवारीला ज्ञान प्रबोधिनीत काही प्रशिक्षण सत्रांसाठी आले आहेत. २४ फेब्रुवारीपर्यंत हे प्रशिक्षण असणार आहे. या प्रशिक्षणाचा मुख्य हेतू विशेष क्षमतावान विद्यार्थ्यांची निवड प्रक्रिया कशी असते ते जाणून घेणे, त्यांसाठीच्या अभ्यासक्रम-योजना, त्यांच्यासाठी घेतल्या जाणाऱ्या विविध शैक्षणिक प्रकल्पांची, नावीन्यपूर्ण उपक्रमांची माहिती करून घेणे, असा आहे.

ज्ञान प्रबोधिनीचे संचालक वाच. गिरीश बापट, प्राचार्य वाच. मिलिंद नाईक, प्रज्ञा मानस संशोधिकेच्या संचालिका वाच. अनघा लवळेकर, वाच. सुजला वाटवे, वाच. धनश्री सोवनी, निगडी केंद्राचे प्रमुख वाच. मनोज देवळेकर, व या विषयातील तज्ज्ञ वर्षा पुराणिक, ईशा कान्हेरे, क्षमा दातार, हेमांगी देशमुख यांनी वेगवेगळी सत्रं घेऊन उपस्थितांना मार्गदर्शन केले तर श्रेयश फापाळे व मृण्मयी वैशंपायन यांनी संपूर्ण प्रशिक्षणांचे नियोजन केले.

याशिवाय ज्ञानप्रबोधिनी प्रशालेच्या प्रथितयश माजी विद्यार्थ्यांशीही या पथकाने संवाद साधला. यामधे सुनिल दाढे (Deputy CAG), वामन पारखी (IRS व सुरेश प्रभू यांचे सचिव), महेंद्र सेठिया (कार्यवाह, ज्ञान प्रबोधिनी), सुवर्णा गोखले (स्त्री शक्ती प्रबोधन), सचिन गाडगीळ (HR तज्ज्ञ) यांचा सहभाग होता. या संवादातून प्रबोधिनीतील वेगळ्या शैक्षणिक उपक्रमांविषयी व विशेषतः बुद्धिवंतांच्या शिक्षणाचे तत्त्वज्ञान आणि विशेष उपक्रम या मंडळींनी समजावून घेतले.

**⁕ 'विद्यार्थ्यांचे नामांकन कसे करायचे' याबद्दल मार्गदर्शन**

दि. ११-१२-१३ मार्च२०२४ रोजी विशेष बुद्धिवान विद्यार्थ्यांसाठी दिल्ली शिक्षण संचालनाच्या अभिषिक्त प्रकल्पामध्ये 'विद्यार्थ्यांचे नामांकन कसे करायचे' याविषयी जवळपास अडीच हजार शिक्षकांचे प्रशिक्षण ज्ञान प्रबोधिनी प्रज्ञा मानस संशोधिकेच्या तज्ञ व्यक्तींनी घेतले. तत्पूर्वी सर्व शिक्षकांना प्राचार्य वाच. मिलिंद नाईक आणि वाच. अनघाताई लवळेकर यांनी मार्गदर्शन केले.

**⁕ देशभरात होणारे शिक्षणविषयक विचार समजून घेण्यासाठी व प्रशालेत होणारे प्रयोग अन्य ठिकाणी पोहोचविण्यासाठी साधन व्यक्ती म्हणून प्रशालेतील सदस्य विविध संस्थांना भेटी देत असतात. अशा काही ठळक भेटी पुढीलप्रमाणे -**

**पालक संघ**

२०२२ साली काही पालकांच्या पुढाकाराने सुरु झालेला पालक संघ आता ज्ञान प्रबोधिनी प्रशालेचा एक महत्त्वाचा भाग झालेला आहे. गेल्या दोन वर्षात पालक संघाने अनेक उपक्रम केले. पालकांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे पालक संघाच्या अभिव्यक्ती गट, क्रीडा गट, किल्ले भ्रमंती गट, पालकांचा बर्ची गट अशा अनेक

शाखा तयार झाल्या आहेत. मागच्या शैक्षणिक वर्षात पालक संघाने अनेक उपक्रम राबवले. त्या उपक्रमांचा हा थोडक्यात आढावा –

**※ अभिव्यक्ती गट**

सप्टेंबर–२३ च्या गणेशोत्सवात गायन, वादन, लेखन, चित्रकला, अभिवाचन अशा वेगवेगळ्या अभिव्यक्तींना सामावून घेत गर्जा महाराष्ट्र माझा हा कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमात सुमारे ४० पालकांनी सहभाग घेतला होता. हा कार्यक्रम प्रशालेतच खालच्या उपासना मंदिरात आणि पाचवी ते सातवी ह्या वयोगटाला उद्देशून केला गेला.

२९ ऑक्टोबर २०२३ रोजी व्यावसायिक कलाकार श्री. अमित ढाणे यांच्या जलरंगांची ओळख आणि निसर्ग चित्र अशा विषयावरच्या चित्रकला कार्यशाळेला पालकांचा उत्तम प्रतिसाद मिळाला.

६ जानेवारी २०२४ ला अंताक्षरी स्पर्धा प्रबोध सभागृहात झाली. भावगीते, भक्तीगीते आणि राष्ट्रभक्ती ह्या विषयांवर ही अंताक्षरी खेळली गेली. अंताक्षरीच्या जोडीला गीतरामायणावर आधारीत नृत्य आणि गायन कार्यक्रम तसेच रांगोळी प्रदर्शन देखील आयोजित केले होते.

१३ जानेवारी २०२४ रोजी सिप्ला कॅन्सर केअर, वारजे येथे कॅन्सर पेशंटस आणि केअर सेंटरच्या सपोर्ट स्टाफसाठी गायन, वादन, नृत्याने सजलेला एक हृद्य कार्यक्रम गटाने सादर केला.

२२ जानेवारी २०२४ ला अयोध्या राममंदिर लोकार्पण सोहळ्याच्या निमित्ताने अभिव्यक्ती गटाने एकाच दिवशी गीतरामायणाचे २ कार्यक्रम केले. हॅपी कॉलनी कोथरुड येथे सकाळी १० ते ११ आणि अक्षरराम उपक्रमाचा समारोप म्हणून संध्याकाळी ६ ते ७ या वेळात प्रशालेच्या मधल्या चौकात गीतरामायण सादर केले गेले.

या सगळ्या गडबडीत एप्रिल महिन्यात होणाऱ्या अभिव्यक्ती गटाच्या सर्वात मोठ्या सादरीकरणाची तयारी चालूच होती. डिसेंबर–२०२३ मधे नियोजन गटाची बैठक घेउन या वर्षीच्या अभिव्यक्ती कार्यक्रमाचा विषय ठरवण्यात आला, मराठी उद्योजकांच्या अनवट वाटा.. नेहमीप्रमाणे लेखन गटाच्या शिलेदारांनी या विषयावर नाटुकली, गीते, पोवाडा, पथनाट्य, किर्तन असं विविध प्रकारचं साहित्य लिहून दिलं. गायन, वादन, नृत्य, नाट्य, अभिवाचन, चित्रकला असे सगळे गट तयारीला लागले. यावर्षी 'इतर अभिव्यक्ती' असा एक नवीन गट तयार झाला आणि त्या कलाकारांनी कार्यक्रमासाठी लागणारे नेपथ्य (props) पर्यावरणपुरक साहित्यापासून स्वत: तयार केले. या सर्व वस्तूंचं एक स्वतंत्र कलाप्रदर्शन खालच्या उपासना मंदिरात भरवण्यात आलं.

२१ एप्रिल २०२४ या दिवशी सुमारे २००–२५० प्रेक्षकांच्या उपस्थितीत अभिव्यक्तः मराठी उद्योजकांच्या अनवट वाटा हा कलाविष्कार कार्यक्रम कर्नाटक शाळेच्या सभागृहात पार पडला. वेगळा विषय आणि उत्तम सादरीकरणामुळे प्रेक्षकांची वाहवा मिळवून गेला.

**※ किल्ले गट**

वर्षांची अगदी सुरुवातीस विसापूर किल्ला झाला. हा छान ऐसपैस असा किल्ला चार पालकांनी सर केला.

सिंहगड हा आपल्या सर्वांचा लाडका ट्रेक. जुलैच्या मध्यावर मागच्या बाजूने, कल्याण दरवाज्याकडून

सिंहगड सर केला. वाट खडतर नसली तरी मळलेली वाट नक्कीच नाहीये. सहभागी पालक संख्या सहा.

ऑगस्ट महिन्याच्या तिसऱ्या आठवड्यात सुधागडाची भ्रमंती झाली. अर्धा पावसाळा उलटून गेल्यावर थोडा सोप्या श्रेणीतला ट्रेक म्हणून सुधागडावर ट्रेक घेतला होता. पूर्ण दिवसाची ही मोहीम वर्षाच्या पुढच्या मोहिमांसाठी नक्कीच प्रेरणादायी ठरली. सहभागी पालक संख्या बत्तीस.

खास पावसाळी भ्रमंती मोहीम म्हणून समजली जाणारी अंधारबन मोहीम. ऐन उत्तरायणाच्या प्रारंभी ही मोहीम केली; अगदी घाट ते खाली कोकण, अशी पूर्ण भ्रमंती केली आणि ती ही सह्याद्रीच्या ऐन मुख्य धारेतून.. सहभागी पालक संख्या पंचवीस.

नोव्हेंबरच्या प्रारंभी तोरणा किल्ला झाला. लगेच दोन आठवड्यांनी येऊ घातलेल्या राजगड ते तोरणा ह्या मोहिमेची ती जणू पूर्वतयारीच होती. सहभागी पालक संख्या चार.

नोव्हेंबरच्या मध्यास राजगड ते तोरणा किल्ला अशी खडतर वाट चोखाळली. ही मोहीम मानसिक कस पाहणारी आणि शारीरिक दमछाक करणारी. सहभागी पालक संख्या चार.

पुढची मोहीम होती जानेवारीत, अगदी मोक्याच्या अशा रोहिडा गडावर.. रोहिडा म्हणजे सह्याद्रीच्या रायरेश्वरकडून निघालेल्या पूर्व फाट्यावरचा चौकीदार किल्ला. आटोपशीर गडपसारा आणि आवाक्यातील चढ. सहभागी पालक संख्या वीस.

मागच्या वर्षीचा परमोच्च बिंदू म्हणजे.. खास पौर्णिमेच्या रात्री केली जाणारी कात्रज ते सिंहगड मोहीम. अनेक जणांच्या बकेट लिस्टमधला हा ट्रेक. जवळपास बावन्न पालकांनी, ज्यांचा सरासरी वयोगट हा ४५ ते ५० वर्षे आहे, अशा सर्वांनी ही मोहीम यशस्वीरित्या पूर्ण केली. शारीरिक आणि मुख्य मानसिक कसोटी. ह्या वयोगटाची एकूण क्षमता पाहता आणि सहभागी पालक संख्या पाहता, ही मोहीम नक्कीच आव्हानास्पद होती. अगदी विनासायास सुफळ संपूर्ण झाली. glorious feather in the cap.

**❊ क्रीडा गट**

शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये पालक संघाच्या क्रीडा गटाने उत्तम प्रगती केली. पाचवीतील पालकांचा लक्षणीय सहभाग यावर्षी क्रीडा स्पर्धांमध्ये दिसून आला.

**१) क्रिकेट –** यावर्षी क्रिकेटचे तीन संघांमधून ४१ पालक निगडी स्पर्धेत सहभागी झाले. गेल्या वर्षीच्या तुलनेत आपल्या संघांनी चांगली प्रगती दाखवली. तीन पैकी एका संघाने बाद फेरीत प्रवेश केला.

**२) टेबल टेनिस –** यावर्षी १३ पालकांनी या स्पर्धेत सहभाग नोंदवला होता त्यापैकी श्री रवींद्र कोठी यांनी (१० पालक) स्पर्धेत तृतीय क्रमांक पटकावला.

**३) थ्रो बॉल –** गेल्या तीन वर्षांपासून माता पालकांचा गट निगडी येथील क्रीडा स्पर्धेत थ्रो बॉल या सांघिक खेळात सहभागी होत आहे.या वर्षी थ्रोबॉलचे दोन गट स्पर्धेत उतरले होते. त्यापैकी एक संघ सेमीफायनलला पोहोचला. दोन्ही संघानी खूप चुरशीचे सामने खेळले आणि निगडी संघाकडून कौतुकाची थापही मिळवली.

**४) बॅडमिंटन –** निगडी येथील वैयक्तिक खेळात बेला महाजन यांनी बॅडमिंटन स्पर्धेत द्वितीय क्रमांक मिळवला

**❊ बरची गट**

बरची नृत्य हे ज्ञानप्रबोधिनीच्या गणेशोत्सवाचे एक प्रमुख वैशिष्ट्य. शालेय विद्यार्थी विविध दलांमधून बरची नृत्यात सहभागी होत असतात. गेल्यावर्षी अनेक पालकांकडून बरची नृत्यात सहभागी

होण्याची इच्छा व्यक्त झाल्यामुळे पालकांसाठी एक वेगळा गट तयार करू यात अशी कल्पना समोर आली. पालकांसोबतच अनेक समवयीन माजी विद्यार्थीदेखील या गटात सहभागी झाले

**बाबा पालक गट –** साधारण वीस बाबा पालकांनी सात हात शिकून घेतले. आठवड्यातून तीन वेळा सराव सत्रांची योजना केली गेली.मुख्य गणेशोत्सवात एक प्रात्यक्षिक व प्रशालेची विसर्जन मिरवणूक अशा दोन ठिकाणी या गटाने सहभाग घेतला. प्रशालेचा विसर्जन मिरवणुकीत साधारण ३० जणांचा हा गट पुढे ५०–६० जणांचा झाला.

**माता पालक गट –** एकूण ७० माता पालक मिळून बरची गट तयार झाला, २ महिने दर शनिवारी सराव होत होता. मुख्य गणेशोत्सवात श्रीमंत भाऊ रंगारी गणपती मंडळात एक प्रात्यक्षिक व प्रशालेची विसर्जन मिरवणूक अशा दोन ठिकाणी या गटाने सहभाग घेतला

माता पालक बरची गटाला मिळालेला उदंड प्रतिसाद पाहून या पालकांना प्रबोधिनी परिवाराचा भाग मानून काही सामाजिक उद्दिष्ट ठरवून त्या वयोगटाचे दल चालू करावे ह्या हेतूने प्रौढ युवती गटाची या निमित्ताने सुरुवात झाली

## ९.३ प्रासंगिक

**❊ प्रबोध उद्योग समूह कृतज्ञता समारंभ**

**दि. १० जून २०२३ रोजी कृतज्ञता समारंभ आयोजित केला होता. ज्ञानप्रबोधिनी प्रशालेमधून बाहेर पडलेले अनेक विद्यार्थी प्रशालेशी ऋणानुबंध कायम ठेवतात. त्यापैकी एक प्रबोध उद्योग समूह. त्यांविषयी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी** प्रबोध उद्योग समूह कृतज्ञता समारंभ विद्यारंभाचे औचित्य साधून करण्यात आला. यावेळी प्रबोध उद्योग समूहाचे मा. मोहनराव गुजराथी आणि त्यांच्या पत्नी **वाच. नलिनीताई गुजराथी, कार्यवाह सुभाषराव देशपांडे** उपस्थित होते. या दरम्यान उपस्थित विद्यार्थ्यांना आणि त्यांच्या पालकांना संकल्पाचं महत्त्व सांगून त्यातली उत्तमता आणि परिपूर्णता प्राप्त करण्याचा प्रयत्न करा असा संदेश त्यांनी उपस्थितांना दिला. मा. मोहनरावांनी आपल्या मनोगतात आपल्या प्रशालेतल्या आठवणींना उजाळा दिला. प्रबोधिनीच्या बाह्य स्वरूपापेक्षा प्रबोधिनीचे अंतरंग व्यक्तिविकासासाठी कार्यविकासासाठी कसे उत्तम आहे, याबद्दल त्यांनी मांडणी केली. प्रबोधिनीचे विद्यार्थी म्हणून आपली वेगळी छाप उमटायला हवी अशीही अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

**❊ संस्कृतदिन**

दि. २९ ऑगस्ट २०२३ रोजी प्रशालेत संस्कृतदिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमात सातवी ते दहावीच्या मुली सहभागी झाल्या होत्या. कार्यक्रमाची पूर्वतयारी व नियोजन दहावीच्या विद्यार्थिनींनी केले. यानिमित्ताने संस्कृत लेखनस्पर्धा घेतली गेली. संस्कृत स्तोत्र पाठांतर, पद्यगायन, प्रश्नमंजूषा असे कार्यक्रम झाले. या कार्यक्रमाच्या निमित्ताने पाठ्येतर संस्कृत वाचन, पाठांतर व्हावे असा हा कार्यक्रम करण्यामागचा हेतू होता.

**⁕ विज्ञान दिन**

दि. २८ फेब्रुवारी रोजी विज्ञान दिनानिमित्त इयत्ता नववीच्या मुला-मुलींना डीआरडीओ या संस्थेबद्दल माहिती देण्यासाठी आणि संशोधक होण्यासाठी लागणाऱ्या विविध कौशल्य, ज्ञान, संधी याबद्दल माननीय सुबोधकुमार नायक यांनी मार्गदर्शन केले. माननीय सुबोधकुमार नायक हे डीआरडीओच्या पी एक्स ई या विभागाचे संचालक आहेत.

**⁕ राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त आयोजित विज्ञान प्रदर्शन**

दिनांक २८ फेब्रुवारी २०२४ रोजी सकाळी डॉ. सी. व्ही. रामन यांच्या कामाबद्दल व विज्ञान दिनाच्या महत्त्वाबद्दल हृषीकेशदादाने सर्व विद्यार्थ्यांशी संवाद साधला. त्यानंतर इयत्ता सहावी व सातवीतील विद्यार्थी-विद्यार्थिनींनी राष्ट्रीय विज्ञान दिनाचे निमित्त साधून प्रशालेत अंतर्गत विज्ञान प्रदर्शन भरवले होते. भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र इत्यादी विषयांमधले विविध प्रकारचे विज्ञान प्रयोग विद्यार्थ्यांनी करून दाखवून इतर वर्गांमधील विद्यार्थ्यांना त्यामागील वैज्ञानिक तत्त्वे समजावली.

**⁕ छात्र प्रबोधन विक्री मार्गदर्शन**

दि. १४ सप्टेंबर २०२३ या दिवशी ४.४५ ते ५.३० या वेळात इयत्ता पाचवी ते सातवीच्या मुले आणि मुलींसाठी छात्र प्रबोधन विक्रीचे Orientation झाले. या सत्रात विद्यार्थ्यांना मा. महेंद्र भाई सेठीया, शिल्पाताई कुलकर्णी, रुपालीताई बापट यांनी मार्गदर्शन केले. अंक विक्री करत असताना वैयक्तिक पातळीवर ती कशी करावी, लोकांना अंक घेण्यासाठी कसे आवाहन करावे, bulk विक्री कशी करावी, त्यासाठी काय आणि कसे प्रयत्न करावेत या संदर्भात महेंद्रभाईंनी मार्गदर्शन केले. शिल्पाताईंनी अंक किती प्रकारचे असतील आणि या वर्षीच्या अंकांचे अंतरंग याविषयी माहिती दिली. रुपालीताईंनी पावती पुस्तकात अंक विक्रीची नोंदणी कशी करावी, गुगल फॉर्म वापरून अंकांचे मिळालेले पैसे कसे भरावेत इत्यादी तांत्रिक माहिती विद्यार्थ्यांना दिली.

**⁕ छात्र प्रबोधन विक्री उपक्रम**

दि. १० ऑक्टोबर आणि ११ ऑक्टोबर २०२३ रोजी दरवर्षीप्रमाणे यावर्षी सुद्धा इयत्ता पाचवी ते सातवीसाठी छात्र प्रबोधन विक्री उपक्रम झाला. वैयक्तिक आणि bulk स्वरूपात ही विक्री विद्यार्थी आणि विद्यार्थिनींनी शाळेच्या वेळाव्यतिरिक्तच्या वेळेत केली. इयत्ता सातवी मुले आणि मुलींसाठी मात्र विक्रीचा अनुभव घेण्यासाठी शाळेच्या वेळातील आणखी जास्तीचा वेळ देण्यात आला. सातवी मुले दुपारी २.३० ते ५.३० या वेळेत एकत्र गटाने शाळेच्या आसपासच्या भागात विक्रीसाठी गेले. त्यांना हे भाग विभागून दिले गेले होते. त्या त्या भागात मुले व मुलींनी वैयक्तिक तसेच bulk विक्री केली. या विक्री अनुभवाबाबत वर्गामध्ये चर्चा घेण्यात आली.

**⁕ ज्ञान प्रबोधिनी प्रशाला ग्रंथालय – ग्रंथ प्रदर्शन**

दि. ४ व ५ जानेवारी २०२४ दरम्यान ज्ञान प्रबोधिनी प्रशाला ग्रंथालयात नव्याने दाखल झालेल्या

ग्रंथांचे ग्रंथ प्रदर्शन भरविले होते. पुस्तक प्रदर्शनात कादंबरी, चरित्र, खगोलशास्त्र, डॉ. अब्दुल कलाम व पु. ल. देशपांडे यांचे ग्रंथसंग्रह, पर्यावरण विषयक पुस्तके आणि हो यावर्षी दिवाळी अंकांनी पण प्रदर्शनाची शोभा वाढविली होती. अशा विविध साहित्यप्रकारानुसार, लेखकानुसार पुस्तकांचे वैविध्य होते. इंग्रजी व मराठी दोन्ही भाषांमधील पुस्तके प्रदर्शनात मांडली होती. काही लेखकांच्या प्रकाशचित्रांनी व कुसुमाग्रज, विंदा करंदीकर यांच्या कविता पण प्रदर्शनात लावल्या होत्या. पु. ल. देशपांडे बेस्ट इन्स्पायरिंग कोटेशन इन इंग्लिश मुलांना वाचता आली. दि. ४ जानेवारी २०२४ हा दिवस फक्त मुलींच्या वर्गांनी प्रदर्शन बघण्यासाठी राखीव ठेवला होता, तर दि. ५ जानेवारी २४ या दिवशी सर्व मुलांचे वर्ग प्रदर्शन पाहण्यास आले होते. शाळा भरायच्या आधी, मधली सुट्टी, शाळा सुट्टीवरही ग्रंथ प्रदर्शन पाहण्याचा, पुस्तक हाताळण्याचा आणि वाचनाचा आनंद मुलांनी घेतला. ग्रंथ प्रदर्शन दोन दिवस असल्यामुळे अनेक विद्यार्थी, शिक्षक, कर्मचारी सदस्यांना प्रदर्शनास भेट देता आली. प्रदर्शनाच्या निमित्ताने ग्रंथालयात असलेली पण विद्यार्थ्यांनी न बघितलेली पुस्तक त्यांना पाहायला व हाताळायला मिळाली. नवीन कोरी पुस्तके आणि त्यांना आवडलेली पुस्तके घरी वाचनासाठी नेण्यासाठी विद्यार्थ्यांची गडबड चालू होती. प्रदर्शनाला खूपच चांगला प्रतिसाद मिळाला.

**⁕ कार्यक्षेत्र मार्गदर्शन कार्यशाळा**

दि. ११ फेब्रुवारी रोजी इयत्ता नववी मुले–मुली व पालक यांच्यासाठी कार्यक्षेत्र मार्गदर्शन कार्यशाळा प्रबोध सभागृह येथे आयोजित केली होती. या कार्यशाळेला माननीय विवेक वेलणकर सर यांनी मार्गदर्शन केले. इयत्ता दहावीनंतर कार्यक्षेत्राच्या असणाऱ्या विविध दिशा उलगडून सांगितल्या. त्यासाठी करावी लागणारी पूर्वतयारी, पुढे मिळणारा प्रवेश आणि त्यानंतर असणाऱ्या नोकरीच्या संधी या सर्वांबद्दल सरांनी मार्गदर्शन केले. मुलांच्या व पालकांच्या प्रश्नांना उत्तरे दिली.

**⁕ कर्मचारी सदस्य सहल**

दि. २१ नोव्हेंबर २०२३ रोजी सर्व कार्यालय, ग्रंथालय व कर्मचारी सदस्य यांच्याकरिता शैक्षणिक सहल धोम–मेणवली–वाई–मांढरदेव इत्यादी ठिकाणी आयोजित केली होती. सकाळी ६.०० प्रबोधिनीतून उपासना करून सर्वजण रायरेश्वर मार्गे धोमच्या नृसिंह मंदिरासाठी निघाले. वाटेत रायरेश्वरच्या पायथ्याला पाय मोकळे करण्यासाठी उतरलेल्या मंडळींनी आयत्या वेळेस उत्साह दाखवून रायरेश्वर गड चढण्याचा निर्णय घेऊन या वर्षीच्या गड दर्शनाच्या संकल्पाचा श्रीगणेशा केला. नंतर धोमला लक्ष्मी नृसिंह मंदिर पाहून मेणवलीला नाना फडणवीस यांचा वाडा पाहिला व दृकश्राव्य माध्यमातून समजूनही घेतला. वाईला ढोल्या गणपती व विश्वेश्वराचे दर्शन घेऊन जेवण केले व पुढे मांढरदेवीचे दर्शन करून पुण्यात परतले. या सहलीत सदस्यांनी वाई परिसरातील ऐतिहासिक, सांस्कृतिक व धार्मिक स्थळांची माहिती घेतली.

**⁕ सहनिवास वृत्त (मुले)**

सहनिवास अभ्यासिका प्रशालेतील सहनिवासात राहणाऱ्या विद्यार्थी आणि विद्यार्थिनींसाठी जून ते मार्च या कालावधीत सकाळ आणि संध्याकाळी अभ्यासिका तसेच इंग्रजी आणि गणित विषयासाठी सराव वर्ग

योजण्यात आले होते.

**⁕ सहनिवास वृत्त (मुली)**

**सहनिवास अभ्यासिका**

सहनिवास अभ्यासिका प्रशालेतील सहनिवासात राहणाऱ्या विद्यार्थी आणि विद्यार्थिनींसाठी जून ते मार्च या कालावधीत सकाळ आणि संध्याकाळी अभ्यासिका तसेच इंग्रजी आणि गणित विषयासाठी सराव वर्ग योजण्यात आले होते.

सहनिवासात राहणाऱ्या मुलींना वैयक्तिक मार्गदर्शन घरी उपलब्ध नसल्यामुळे शाळेतच त्यांच्या अभ्यासातील अडचणी सोडवून अभ्यासक्रम व गृहपाठ पूर्ण व्हावा या हेतूने ही अभ्यासिका सुरू करण्यात आली आहे.

यामध्ये एकूण पाचवी ते आठवी मिळून २५ मुलींसाठी दोन मार्गदर्शकांची नेमणूक करण्यात आली होती.

**⁕ मातृभूमी पूजन**

कार्यालय सदस्यांनी वर्षारंभी केलेल्या संकल्पानुसार दर दोन–तीन आठवड्यातून एका शनिवारी एका कार्यालयीन, ग्रंथालय व कर्मचारी सदस्यांच्या घरी गृहभेट व मातृभमी पूजन करायचे असे ठरले होते. त्यानुसार या वर्षी सोनाली कुलकर्णी, पवारकाका, सोनाली डांगमाळी यांच्या घरी गृहभेट व मातृभूमी पूजनाचा कार्यक्रम पार पडला.

# १०. कृतज्ञता

**※ शालेय शुल्क शिष्यवृत्ती**

विविध शालेय व सहशालेय उपक्रमांची रेलचेल असूनही आपल्या प्रशालेचे शालेय शुल्क इतर शाळांच्या तुलनेत कमी आहे. हे आपण आपल्याकडे सर्व आर्थिक व सामाजिक स्तरांतून विद्यार्थी-विद्यार्थिनी यावेत म्हणून अवलंबिलेले धोरण आहे. तरीही निवड झालेल्या विद्यार्थी-विद्यार्थिनींमध्ये आहे ते शुल्क भरण्याचीही अडचण असलेले अनेकजण असतात. विशेषत: ग्रामीण भागातून आलेल्या विद्यार्थ्यांना शालेय व सहनिवास असे दोन्ही शुल्क भरायचे असल्याने आर्थिक अडचण असते. त्यामुळे आपल्या निवड चाचणीमध्ये उत्तीर्ण झालेल्या कोणताच विद्यार्थी-विद्यार्थिनी प्रशालेतील विशेष शिक्षणापासून वंचित राहू नये म्हणून आपण अशा विद्यार्थी-विद्यार्थिनींना जास्तीत जास्त आर्थिक मदत करत असतो. मनुष्यघडण व वृत्तीघडण हे प्रमुख उद्दिष्ट समोर ठेवून शिक्षण क्षेत्रात कार्य करत असल्याने निवड झाल्यानंतर आर्थिक अडचण हा प्रवेशासाठी कधीच अडथळा ठरत नाही. अशा मुलांसाठी आर्थिक शिष्यवृत्तीचे अर्ज भरून घेतो. त्याबरोबर उत्पन्नाचा दाखला व इतर विशेष खर्चाची कागदपत्रे दाखल करून घेतो. २-३ सदस्यीय समिती या सर्व अर्जांची छाननी करून, गृहभेट व पालकांची मुलाखत घेऊन शिष्यवृत्तीची रक्कम निश्चित केली जाते. अशा सढळ हाताने देणगी देणाऱ्या हितचिंतकांच्या आधारे प्रशालेमधील अनेक नावीन्यपूर्ण उपक्रमही चालतात. या सर्व हितचिंतकांची प्रशाला मन:पूर्वक आभारी आहे. प्रशालेतील प्रयोगशीलता व स्वायत्तता टिकण्यामागे आपला सर्वांचा मोलाचा हातभार आहे. आपले मन:पूर्वक धन्यवाद!

इ.५वी ते १०वी मधील एकूण २२ विद्यार्थी-विद्यार्थिनींना या वर्षी एकूणात रु.१३,४४,२९० रकमेची शिष्यवृत्ती दिली गेली.

## २०२२-२३ या वर्षात देणगी देणारे हितचिंतक

| | |
|---|---|
| १) शीला लिमये | ५०००००/- |
| २) शशांक मंदार चांदोरकर | १५००००/- |
| ३) सचिन गाडगीळ | १०१०००/- |
| ४) सौमित्र जोशी | १०००००/- |
| ५) ले.एस.एम. अभ्यंकर | १०००००/- |
| ६) मोहना एम. बोडस | १०००००/- |
| ७) पल्लवी देशपांडे | ८८१११/- |
| ८) संदीप एस. वाव्हळ | ७१०००/- |
| ९) शालिनी मंदार बडे | ६१०००/- |
| १०) अपूर्वा इनामदार | ५१००१/- |
| ११) नरेंद्र आणि अनिता देशमुख | ५१०००/- |
| १२) प्रकाश वाटवे | ५००००/- |
| १३) डॉ. अदिती गुजराथी | ५००००/- |
| १४) डॉ. मिलिंद मोडक | ५००००/- |
| १५) डॉ. धनंजय केळकर | ५००००/- |
| १६) आरती बादरायणी | ५००००/- |
| १७) आदित्य केळकर | ५००००/- |
| १८) विभाकर कृष्णराव मिरजकर | ३००००/- |
| १९) राहुल धर्माधिकारी | ३००००/- |
| २०) मनोज मोकाशी | ३००००/- |
| २१) जयंत सावळाराम बिडवाई | २५०००/- |
| २२) कविता प. कुलकर्णी | २५०००/- |

| | |
|---|---|
| २३) यशश्री एस. कुलकर्णी | २५०००/- |
| २४) नितीन सुधीर कर्वे | २५०००/- |
| २५) रवी शरद आवटे | २५०००/- |
| २६) अजित तुकाराम शेटे | २५०००/- |
| २७) शर्मिष्ठा चिपळूणकर | २५०००/- |
| २८) प्रद्युम्न वैद्य | २५०००/- |
| २९) डॉ. मृणालिनी मोघे | २५०००/- |
| ३०) डॉ. अश्विन एस. जोशी | २५०००/- |
| ३१) तुषार कानडे | २५०००/- |
| ३२) डॉ. जयेश रहाळकर | २५०००/- |
| ३३) डॉ. गिरीश गोडबोले | २५०००/- |
| ३४) डॉ. सचिन गांधी | २५०००/- |
| ३५) डॉ. उत्क्रांत कर्लेकर | २५०००/- |
| ३६) नितीन राजहंस | २५०००/- |
| ३७) अमित वसंत गद्रे | २५०००/- |
| ३८) विक्रम कामठे | २५०००/- |
| ३९) ऋतुज आर. जोशी | २१०००/- |
| ४०) सागर गरुळे | २००००/- |
| ४१) विनीत धेंडे | २००००/- |
| ४२) आदित्य केळकर | २००००/- |
| ४३) सागर कानडे | २००००/- |
| ४४) चिन्मय मकरंद कानिटकर | २००००/- |
| ४५) प्रतिक पत्की | २००००/- |
| ४६) यशोधन एस. डोंगरे | २००००/- |
| ४७) हृषिकेश देशमुख | २००००/- |
| ४८) सन्मित शहा | २००००/- |
| ४९) डॉ. सायली एन. पेंडसे | २००००/- |
| ५०) चारुदत्त राणे | २००००/- |
| ५१) नितीन कोरेगावकर | २००००/- |
| ५२) प्रतिक पत्की | २००००/- |
| ५३) सुश्रुत पावनसकर | १६६६६/- |
| ५४) उमा विश्वनाथन | १५०००/- |
| ५५) ऋता थिटे | १५०००/- |
| ५६) मनाली अभिजीत पेठकर | १५०००/- |
| ५७) निनाद चंद्रकांत प्रधान | १५०००/- |
| ५८) संजय वसंत बर्वे | १५०००/- |
| ५९) कुमार परिसर | १५०००/- |
| ६०) प्रथमेश अभय वैद्य | १२५००/- |
| ६१) निखील वनपाल | १२०००/- |
| ६२) आनंद एस. पारखी | ११११११/- |
| ६३) संविद कुर्लेकर | ११०००/- |
| ६४) गणेश डांगी | ११०००/- |
| ६५) अमित प्रकाश गोडबोले | ११०००/- |
| ६६) विराज कीर्तीकुमार देओचाके | ११०००/- |
| ६७) अमेय सुरेश नवरे | ११०००/- |
| ६८) अनंत एम. बागडे | १०००१/- |
| ६९) युटिका पटवर्धन | १०००१/- |
| ७०) सुरेश गोपाल पटवर्धन | १००००/- |
| ७१) सतीश खाडे | १००००/- |
| ७२) मंदार जोशी | १००००/- |
| ७३) वर्षा एस. नातू | १००००/- |
| ७४) निनाद सामल | १००००/- |
| ७५) वृंदा गाडगीळ | १००००/- |
| ७६) नेहा लिमये | १००००/- |
| ७७) डॉ. सुनील गोडबोले | १००००/- |
| ७८) डॉ. शीतल गायकवाड | १००००/- |
| ७९) अखिलेश कसबेकर | १००००/- |
| ८०) आशुतोष बारमुख | १००००/- |
| ८१) अतुल वी. एदलाबादकर | १००००/- |
| ८२) दिलीपकुमार गोविंद गोखले | ८०००/- |
| ८३) सिद्धांत कुलकर्णी | ६००१/- |
| ८४) सारंग डी. खरे | ६००१/- |
| ८५) प्रणव पुजारी | ५४७५/- |
| ८६) मिलिंद भालचंद्र उप्लाविकार | ५०५१/- |
| ८७) सागर कानडे | ५००१/- |
| ८८) विकास तोपकार | ५०००/- |

| | |
|---|---|
| ८९) अशोक विद्यालय आणि ज्युनिअर कॉलेज | ५०००/- |
| ९०) वनिता विजय अंबिके | ५०००/- |
| ९१) अशोक विद्यालय आणि ज्युनिअर कॉलेज | ५०००/- |
| ९२) अमित जोशी | ५०००/- |
| ९३) प्रत्युमा कामत | ५०००/- |
| ९४) पद्मपराग केळकर | ५०००/- |
| ९५) अभिजीत कापरे | ५०००/- |
| ९६) निरंजन चंद्रकांत शिंत्रे | ५०००/- |
| ९७) निनाद भूषण प्रभुणे | ५०००/- |
| ९८) जुतिका कोल्हटकर | ५०००/- |
| ९९) श्रीधर प्रकाश लोणकर | ५०००/- |
| १००) श्रीकांत काशिद | ५०००/- |
| १०१) प्रशांत जोशी | ५०००/- |
| १०२) अजय पाठक | ५०००/- |
| १०३) मधुसुदन सी. भिडे | ५०००/- |
| १०४) अश्विनी जतकर | ५०००/- |
| १०५) मृण्मयी पाटणकर | ५०००/- |
| १०६) कैलास भट | ५०००/- |
| १०७) अमृत सामक | ३५५०/- |
| १०८) परेश बी. शिंदे | ३०००/- |
| १०९) माधुरी नातू | ३०००/- |
| ११०) रंजना बाखले | ३०००/- |
| १११) प्रणव पुजारी | २९००/- |
| ११२) अमृत सामक | २७३०/- |
| ११३) अमृत सामक | २५२०/- |
| ११४) डॉ. मनोज ठाकूर | २५०१/- |
| ११५) नीरज एन. पै | २५००/- |
| ११६) नीरज एन. पै | २५००/- |
| ११७) प्रमथ केळकर | २५००/- |
| ११८) नीरज एन. पै | २५००/- |
| ११९) संकेत जोशी | २५००/- |
| १२०) वंदना बी. म्हस्के | २५००/- |
| १२१) नीरज एन. पै | २५००/- |
| १२२) नीरज एन. पै | २५००/- |
| १२३) अमृत सामक | २२००/- |
| १२४) स्मिता एम. बर्वे | २०००/- |
| १२५) मोरेश्वर डी. बर्वे | २०००/- |
| १२६) स्मिता एम. बर्वे | २०००/- |
| १२७) संजीव गोपाल भोकरीकर | २०००/- |
| १२८) प्रेरणा फौंडेशन | २०००/- |
| १२९) प्रमथ केळकर | २०००/- |
| १३०) प्रमथ केळकर | २०००/- |
| १३१) अपूर्व करमळकर | २०००/- |
| १३२) श्रेयस नरगुंद | २०००/- |
| १३३) कौस्तुभ पाठक | २०००/- |
| १३४) अमृत सामक | १८९०/- |
| १३५) गीता उ. घैसास | १५००/- |
| १३६) चेतन एरंडे | ११११/- |
| १३७) अनिकेत पांडे | ११११/- |
| १३८) नमिता अगरवाल | ११११/- |
| १३९) मधुरा धनंजय हिरवे | १००१/- |
| १४०) गायत्री शंतनू पाटसकर | १००१/- |
| १४१) सुशांत कारेकर | १००१/- |
| १४२) रोहन बि. सरोदे | १००१/- |
| १४३) सचिन गाडगीळ | १००१/- |
| १४४) मिलिंद देव | १०००/- |
| १४५) गौरांग रमाकांत काणे | १०००/- |
| १४६) प्रमथ केळकर | १०००/- |
| १४७) श्रीकांत काशीकर | १०००/- |
| १४८) डॉ. मंदार अक्कलकोटकर | १०००/- |
| १४९) प्रमथ केळकर | १०००/- |
| १५०) वर्ष येन्नामाडी | १०००/- |
| १५१) मकरंद लेले | १०००/- |
| १५२) रजत जोशी | १०००/- |

| | |
|---|---|
| १५३) रजत जोशी | १०००/- |
| १५४) अविनाश श्रोत्री | १०००/- |
| १५५) सुशांत देशपांडे | १०००/- |
| १५६) राजेश परब | १०००/- |
| १५७) मनीष पोफळे | १०००/- |
| १५८) वेद गुमास्ते | १०००/- |
| १५९) राजीव बसार्गेकर | १०००/- |
| १६०) हृषिकेश केसकर | १०००/- |
| १६१) दीप्ती टिकेकर | १०००/- |
| १६२) रजत जोशी | १०००/- |
| १६३) राहुल रासने | ७००/- |
| १६४) महेंद्र वैशंपायन | ७००/- |
| १६५) दिपाली भिडे | ७००/- |
| १६६) श्रीराम दिंडोरे | ५०१/- |
| १६७) अभिजीत गुर्जर | ५००/- |
| १६८) अभिजीत गुर्जर | ५००/- |
| १६९) आशा विश्वासराव | ५००/- |
| १७०) सारंग कान्हेरे | ५००/- |
| १७१) स्नेहल राऊत | ५००/- |
| १७२) अक्षय पटवर्धन | ५००/- |
| १७३) सुश्रुत पावनसकर | ५००/- |
| १७४) गौरांग रमाकांत काणे | ५००/- |
| १७५) संकेत भंडारे | ४००/- |
| १७६) विनीत मधुकर सहस्त्रबुद्धे | ३००/- |
| १७७) प्रथमेश पायगुडे | ३००/- |
| १७८) रजत गांधी | ३००/- |
| १७९) अनिरुद्ध रविंद जोशी | २५०/- |
| १८०) एन. एल. सावजी | २५०/- |
| १८१) अथर्व काळे | २००/- |
| १८२) सोहम किरण लोंढे | २००/- |
| १८३) श्रीनिवास देसाई | १००/- |
| १८४) साहिल प्रविण कर्डिले | १००/- |
| १८५) शर्व देशपांडे | १००/- |
| १८६) नचिकेत विनीत नित्सुरे | १००/- |
| १८७) तुषार कानडे | १००/- |
| **एकूण** | **३०६७३५०/-** |